मराठी ग्रंथ संग्रहालय.
ठाणे.

# सौभाग्यरत्नमाळा.

भाग पहिला,

अथवा

रामचंद्र भिकाजी गुंजीकर

यांनीं

विविधज्ञानविस्तार मासिकपुस्तकामध्यें निरनिराळ्या वेळीं
लिहिलेले स्त्रीशिक्षणसंबंधी लेख,
कर्त्याच्या संमतीनें

१८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून

जगमित्र आणि माजगांव प्रिंटिंग छापखा-
न्यांत छापिला.
१८८६

विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत विकत मिळेल.

किंमत ६ आणे.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| शांतशीला.. .... .... .... .... | १ |
| स्त्रीक्रोधाचें सांत्वन. .... .... .... | १९ |
| सुबोध संवाद.... .... .... .... | २२ |
| स्त्रीचें तेज. .... .... .... .... | २९ |
| मुलांचें शिक्षण... .... .... .... | ३१ |
| मुलीचें लग्न...... .... .... .... | ३३ |
| माता आणि बालक...... .... .... | ३७ |
| सुसंवाद. १. .... .... .... .... | ४० |
| सुसंवाद. २. .... .... .... .... | ४६ |
| बायको भली तर नवरा भला. .... | ५० |
| सुसंवाद. ३. .... .... .... .... | ७१ |

# सूचना.

**विविधज्ञानविस्तार** मासिक पुस्तकामध्यें कांहीं वर्षांमागें हे लेख आले होते. यांतील कित्येक लेख इंग्लिश पुस्तकांतील लेखांच्या आधारानें लिहिले आहेत, कित्येक नवीनच आहेत. हे एकत्र करून छापविल्यास स्त्रीशिक्षणाच्या कामीं यांचा चांगला उपयोग होईल, असें कित्येक लोकांनीं सुचविल्यावरून ते पुस्तकरूपानें एथें छापविले आहेत.

# सौभाग्यरत्नमाला.

———oo———

## शांतशीला.

प्राचीनकाळीं उत्तरदेशामध्यें सुधन्वा नामें एक प्रख्यात राजा राज्य करीत असे. तो तरुण व अविवाहित असल्यामुळें त्याणें आपला सर्व वेळ मृगयेंत घालवावा. त्याच्या मनांत स्त्रीपुत्रादि संसारसंबंधी विचार कधींच येत नसत. परंतु हें त्याच्या प्रजेस न आवडतां त्याच्या मागें राज्यास वारस असावा, व आपल्यास प्रभु नाहींसा होऊं नये, या हेतूनें ती प्रजा त्याला विवाह करण्याविषयीं फारच आग्रह करूं लागली; आणि त्याच्या मनाजोगी व प्रजेचें कल्याण करणारी अशी उत्तम कुळांतील स्त्री पाहून देण्याचें सुद्धां कित्येकांनीं कबूल केलें. हें ऐकून तो ह्मणाला, “हे सद्गृहस्थ हो! या जगांत निरनिराळ्या लोकांचे स्वभाव निरनिराळे असतात; तेव्हां आपल्या मनाजोगत्या स्वभावाचीं मनुष्यें मिळणें किती कठीण आहे, आणि भिन्न स्वभावाच्या स्त्रीशीं ज्याची गांठ पडते त्या नराचें जिणें किती दुःखकारक होतें, या गोष्टीचा पुरा विचार न करितां, तुह्मी माझा निश्चय मोडण्याविषयीं मला आग्रह करितां खरें; परंतु कुळावरून मुलीच्या गुणांची परीक्षा करणें, आणि जिच्यापासून मला सुखप्राप्ति होईल अशीच कुलीन स्त्री शोधून काढतों ह्मणणें, ह्या गोष्टी हास्यास्पद आहेत; कारण मातापित्यांच्या स्वभावाहून भिन्न स्वभावाच्या मुली किती बरें आपल्या दृष्टीस पडतात? तथापि असो;

ज्या अर्थी मी संसारपाशांत पडावें असा तुमचा आग्रह-च आहे, त्या अर्थी मीही तुमचें ह्मणणें मान्य करितों; परंतु विपरीत घडल्यास दुसऱ्यांवर माझा शब्द नसावा, याकरितां मला जी आवडेल त्या स्त्रीशीं मी लग्न करीन; आणि कोठचीही स्त्री मी आणिली तथापि माझ्या स्त्रीला जो योग्य सन्मान, तो जर तुह्मी तिला न द्याल, तर माझ्या मनांत नसतां आग्रहानें लग्न करवून मला दुःखांत पाडल्याचें पाप तुह्मांस भोगावें लागेल." हें ऐकून सर्व मोठमोठे प्रामाणिक सरदारलोक ह्मणाले—"महाराज, आपणांस जी स्त्री आवडेल तिशीं आपण सुखें लग्न करावें; त्या गोष्टीचा आह्मां सर्वांस संतोष आहे"

राजा शिकारीस गेला ह्मणजे, उन्हाचे प्रहरीं कधीं कधीं जवळच्या खेड्यांत जाऊन एका कुळंब्याचे घरीं कांहीं वेळ विश्रांति घेत असे. तेथें त्याची एक मुलगी होती. तिचा सुस्वभाव आणि शांतपणा पाहून राजास वाटलें कीं, इच्या संगतीनें आपले दिवस सुखानें जातील, याकरितां लांब जाऊन मुलीचा शोध न करितां, इजबरोबरच लग्न करावें. नंतर त्याप्रमाणें निश्चय ठरवून त्यानें तिच्या गरीब बापास बोलावून आणिलें, आणि त्यास आपलें मनोगत कळविलें. नंतर आपल्या सर्व प्रजेस एकीकडे जमवून तो त्यांस पुनः ह्मणाला,—"गृहस्थहो, फक्त तुमच्या आग्रहास्तव मी लग्न करितों; याकरितां तुह्मीं जें वचन दिलें आहे, त्याची तुह्मांस पक्की आठवण असूं द्या. या शेजारच्या खेड्यांत माझ्या मनाजोगी एक उपवर कन्या मीं निवडून काढिली आहे. तिला थोडक्याच दिव-

सांत माझी बायको करून राजवाड्यांत घेऊन यावें, असें माझ्या मनांत आहे. याकरितां माझ्या लग्नसमारंभाविषयीं आणि आपल्या धनिणीचा योग्य सन्मान ठेवण्याविषयीं तुह्मांकडून तयारी असली पाहिजे, ह्मणजे मला मोठा आनंद होईल." तेव्हां सर्व लोकांनीं मोठ्या आनंदानें ती गोष्ट मान्य करून मोठमोठ्या मेजवान्यांची तयारी चालविली. राजानेंही आपल्या राज्यांतील सरदार, मानकरी, सोयरे धायरे वगैरे सर्वांस आमंत्रणें पाठवून मोठा समारंभ मांडिला; मुकुट व नाना प्रकारचे अलंकार तयार कराविले; उंची उंची अनेक वस्त्रपात्रें आणविलीं; आणि नवरीस ज्या वस्तु अवश्य लागावयाच्या, त्या सर्व तिच्या आंगलटीच्या अजमासानें तयार करविल्या. नंतर नेमलेली मुहूर्ततिथि येतांच सर्व तयारीनें जाहगीरदार, सरदार, स्नेही इत्यादि मोठा समाज बरोबर घेऊन सकाळीं प्रहर दिवसास राजा रथारूढ झाला. आणि मोठ्या डामडौलानें सर्व सरंजामानिशीं त्या खेड्यास येऊन पोंचला. जेव्हां ते सर्व त्या शेतकऱ्याच्या घराजवळ आले, तेव्हां विहिरीवरून पाण्याची कळशी घेऊन त्या शेतकऱ्याची मुलगी घाईघाईनें घरीं येत होती. तिला आपल्या लग्नाचें कांहींच वर्तमान माहीत नव्हतें; परंतु आपल्या घरचें काम संपवून आपल्या मैत्रिणींबरोबर लवकर लवकर राजाची बायको पाहण्यास जावें, ह्मणून ती मोठ्या गडबडींत होती. तिला पाहतांच राजानें **'शांतशीले'** ह्मणून तिला हाक मारिली, आणि, 'तुझा बाप कोठें आहे?'—ह्मणून विचारिलें. ती मोठ्या मर्या-

देनें ह्मणाली, " जी महाराज, ते घरांत आहेत." तेव्हां बरोबरच्या मांडलीक राजांस व इतर मंडळीस तेथेंच ठेवून तो आपण एकटाच रथावरून उतरून झोंपडींत शिरला; आणि तिच्या बापास भेटून ह्मणाला—" सांगितल्याप्रमाणें तुझ्या मुलीशीं विवाह करण्याकारितां मी आलों आहें. परंतु तत्पूर्वीं तुझ्यासमक्ष मी तिला कांहीं प्रश्न करणार." असें ह्मणून त्यानें तीस प्रश्न केला, तो असा:—" कोणत्याही वेळीं मी तुला काय पाहिजे तें बोलेन, व काय पाहिजे तें करीन, तथापि त्याचा कांहीं खेद न मानितां, मला निरंतर संतुष्ट ठेवण्याचा तूं मनापासून प्रयत्न करशील कीं नाहीं? आणि, कांहीं जरी कारण नसलें तरी, मला संतोष व्हावा एवढ्यासाठींच, मी जें जें सांगेन तें तें तूं आनंदानें करशील कीं नाहीं?" ती ह्मणाली, "होय करीन." नंतर राजानें तिचा हात धरून तिला बाहेर आणिलें, आणि बरोबर आणलेल्या सुंदर मौल्यवान वस्त्रभूषणांनीं तेथच्यातेथें तिला शृंगारवून, तिच्या त्या तसल्याच विसकटलेल्या केशांवर मुकुट घातला. हें पाहून सर्व लोक चकित झाले. तेव्हा त्यांस तो ह्मणाला कीं, " जी राणी करून घ्यावी असें माझ्या मनांत आहे ती हीच! पण हिच्या मात्र मनास आलें पाहिजे." तिनें लज्जेनें मान खालीं घातली. तेव्हां तिजकडे फिरून तो म्हणाला, "मला तूं नवरा करून घेतेस काय?" ती म्हणाली, "होय सरकार, आपल्या मनास आलें तर." तो म्हणाला "बरें तर, तूं माझी बायको". याप्रमाणें सर्व लोकांसमक्ष वाङ्निश्चय करून त्यांनीं एकमेकांस मा-

ळा घातल्या; आणि उभयतां रथारूढ होऊन सर्व सरंजा-मानिशीं नगरास येऊन, जसें एखादे राजकन्येशीं लग्न व्हावें, तसा लग्नसमारंभ झाला. तिच्या राजकीय वस्त्रांबरोबरच तिजवर राजकीय तेज फांकूं लागलें. आणि ती मोठ्या राजवंशांत जन्मलेली आहे अशी दिसूं लागली. यामुळें ज्यांणीं तिला पूर्वीं पाहिलें होतें, त्यांस मोठेंच आश्चर्य झालें. तिणें नवऱ्याच्या आज्ञेप्रमाणें वागण्यास काडीभरही चुकूं नये. ती सर्व गोष्टींत फारच सुशील असल्यामुळें, सर्व जगांत आपणच सुखी असें राजाला वाटूं लागलें. ती सर्व प्रजांवर फारच ममता करूं लागली, व त्यांच्या कल्याणाकडे सदोदित लक्ष देऊं लागली. यावरून ते लोक तिजवर अतिशयित प्रीति ठेवून आणि तिच्या अधिकाराप्रमाणें तिला योग्य सन्मान देऊन, दीर्घायुष्य आणि चिरकाल वैभव यांच्या आशीर्वादांचा तिजवर वर्षाव करूं लागले. आणे खेडेगांवांतील असली ही दारिद्री आणि मळीण वस्त्रें नेसलेली स्त्री असतां, तिच्या आंगीं असे सद्गुण आहेत, ही गोष्ट आपला सुधन्वा राजा याशिवाय दुसऱ्या कोणासही उमगली नसती, तस्मात् याच्यासारखा दुसरा खरा पारखी व शाहणा राजा या त्रिभुवनांत मिळणार नाहीं, असें त्यांस वाटूं लागलें. थोडक्याच वेळांत तिच्या विचारी स्वभावाविषयीं व सत्कृत्यांविषयीं त्या देशांत लौकिक पसरून, शिवाय बाहेरही जिकडे तिकडे सर्व दुनयेचे तोंडीं तिचे सद्गुण होऊन गेले; आणि आरंभीं तिच्या लग्नाच्या वेळीं जे लोक आड आले होते, त्यांच्याही मनांचे विचार फिरले. याप्रमाणें तीं उभय-

ता आनंदांत असतां थोडक्याच काळांत ती गरोदर होऊन मास पूर्ण होतांच तिला एक कन्या झाली. तेव्हां राजानें मोठाच उत्सव केला.

याप्रमाणें कांहीं दिवस आनंदांत गेल्यानंतर, कालचक्र फिरल्यामुळें, त्याच्या मनामध्यें एक विलक्षण लहर उत्पन्न झाली. त्याला वाटूं लागलें कीं, मोठीं दुःसह आणि कठोर दुःखें सोसावयास लावून त्या साध्वीचा सहनशीलपणा कोठवर टिकाव धारितो, याची परीक्षा पाहावी. असें मनांत येतांच, संतप्त मुद्रा धारण करून सर्वदा क्रूर भाषणांनीं तिला छळण्याचा त्यानें क्रम चालविला. त्याणें तिला ह्मणावें कीं, "तूं हलक्या कुळांतली, ह्मणून सर्व लोक फारच असंतुष्ट झाले आहेत; त्यांत आणखी तुला आतां मूल झाल्यामुळें तर ते फारच त्रासले आहेत." हें ऐकून आपला दृढनिश्चय न सोडितां व किंचित्‌ही वाईट तोंड न करितां तिनें ह्मणावें,—"महाराज! आपल्या पदवीस आणि सुखास कमीपणा न येऊं देतां आपल्या इच्छेस येईल त्याप्रमाणें माझी व्यवस्था करावी. नीचाहून मी नीच आहें; आपण कृपाळू होऊन ज्या पदवीस मला चढविलें आहे, तिला मी सर्वांशीं अयोग्य आहें हें मला ठाऊक आहे; तेव्हां, आपण जें कांहीं कराल तें मला मान्य आहे." हें ऐकतांच, आपण दिलेल्या मोठेपणाचा तिला यत्किंचितही गर्व उत्पन्न झाला नाहीं, हें पाहून राजास फार समाधान वाटलें. तथापि जेव्हां तेव्हां तो, त्या मुलीमुळें लोक फार दिलगीर आहेत, असें स्पष्टपणें तीस बोलून दाखवूं लागला; आणि एके दिवशीं त्यानें

आपला एक चाकर तिजकडे पाठवून दिला. त्याला त्यानें सांगून ठेविलेंच होतें, त्याप्रमाणें दुःखित व दीन मुद्रा करून तो ह्मणाला—" राणीसाहेब! मीं आपल्या जीवाची आशा सोडावी, ही एक गोष्ट; किंवा सरकारच्च्या हुकुमाप्रमाणें वर्तणूक करावी, ही दुसरी. याशिवाय तिसरा उपाय राहिलेला नाहीं. सरकारचा हुकूम झाला आहे कीं, आपली मुलगी धाकट्या बाईसाहेब यांना घेऊन येऊन—" असें ह्मणून तो मुकाट्यानें उभा राहिला. हें ऐकतांच, तिनें त्याच्या तोंडाकडे पाहिलें, आणि त्याची ती उतरलेली मुद्रा पाहून, नवरा जें दररोज ह्मणत असे, त्याची तिला आठवण झाली; आणि त्यावरून तिनें तर्क बांधला कीं, मुलीचा नाश करण्याविषयीं राजाची आज्ञा झाली आहे, यांत संशय नाहीं. मग तिनें तें कोमल बालक पाळण्यांतून बाहेर काढिलें, पुनः पुनः कुरवाळून त्याचे मुके घेतले, आणि, 'तुला राखणारा आतां भगवान्', असा त्यास आशीर्वाद दिला. कांहीं झालें तरी तें आईचेंच हृदय; तिला उमाळ्यावर उमाळा येऊं लागला. तथापि तो सर्व आंतल्या आंत दाबून मुखचर्या न बदलतां, संभाळून, तें तिनें त्याच्या स्वाधीन केलें; आणि ह्मणाली, " हें घे. ते तुझे धनी आहेत व माझेही धनी आहेत; त्यांनीं जसें सांगितलें असेल तसें कर; पण दया करून एवढें माझें ऐक कीं, त्यांची आज्ञा असल्यावांचून तूं होऊन रानांत टाकून यास कोल्ह्याकुत्र्यांकडून खाववूं नकोस". त्याणें तें मूल घेतलें, आणि राजाजवळ जाऊन सर्व

मजकूर कळविला. तो ऐकतांच, तिचा एकनिष्ठपणा पाहून त्यास पराकाष्टेचें आश्चर्य वाटलें. तथापि त्यानें त्याच चाकरापाशीं देऊन, तेथून पांच सात कोसांवर सत्यपुर नामक नगरांत किल्ल्यावर त्याचा एक सरदार राहत असे, त्याच्या स्त्रीकडे ती मुलगी पाठवून दिली; आणि ती कोणाची, हें बाहेर न फोडतां, चांगली शुश्रूषा ठेवून तिजकडून विद्याभ्यास करवावा, असें तिला सांगून पाठविलें. नंतर कांहीं दिवसांनीं राजपत्नी पुनः गरोदर झाली व तिला पुत्र झाला. हें पाहून तर राजास अत्यानंद झाला.

परंतु आजपर्यंत त्यानें जी क्रूर वर्तणूक केली, तिजपासून त्याची तृप्ति न होतां, पुनः आणखी तिला दुःख देऊन छळ करण्याचें काम त्यानें सुरू केलें. एके दिवशीं तो फारच संतापल्यासारखें करून तिला ह्मणाला, "हा तुला मुलगा झाला यामुळें तर आतां लोकांमध्यें माझा अगदीं टिकाव लागत नाहीं. माझ्या पाठीमागून शेतकऱ्याचा नातू गादीवर बसणार, आणि आपला प्रभु होणार, ह्मणून सर्व लोकांनीं मोठें बंड माजविलें आहे. त्या पक्षीं, मला त्यांनीं गादीवरून हांकून देऊं नये असें जर तुझ्या मनांत असलें, तर पहिल्या मुलीची जशी अवस्था केली, तशीच या मुलाची केली पाहिजे; आणि तुलाही काढून देऊन माझ्या पदवीला योग्य अशी दुसरी स्त्री केली पाहिजे; यावांचून निर्वाह नाहीं." हें कठोर भाषण तिनें मोठ्या सहनशीलपणानें ऐकून घेतलें; आणि इतकेंच ह्मटलें कीं—"महाराज, जेणें करून आपलें हित आणि समाधान होईल ती गोष्ट आपण अवश्य करावी, मजविषयीं किंचित्‌ही काळजी

करूं नये. कारण ज्या गोष्टीमध्यें आपल्याला आनंद, ती सोडून मला दुसरी कोणतीही गोष्ट प्रिय नाहीं." थोडक्याच दिवसांनीं, पहिली मुलगी आणविली होती त्याप्रमाणेंच हा मुलगाही आणविला, आणि जसा कांहीं मारून टाकण्याकरितांच आणविला आहे, असें दाखवून, जिकडे मुलगी पाठविली होती, तिकडेसच यालाही संभाळ करण्याकरितां पाठवून दिलें. हें दुसरेंही दुःख तिणें पूर्वीप्रमाणेंच दृढ निश्चयानें सहन केलें; हें पाहून राजा थक्क झाला, आणि आपल्या मनांत ह्मणाला कीं, दुसऱ्या कोणत्याही स्त्रीच्या हातून हें कृत्य घडलें नसतें. आपल्या स्त्रीची मुलांवर फारच ममता आहे ही संतोषाची गोष्ट जर राजास माहीत नसती, तर त्याला खचीत वाटलें असतें, कीं मुलांची ममता नसल्यामुळें तिणें तीं देऊन टाकिलीं. परंतु त्यांजवर तिची किती ममता होती हें त्यास ठाऊक होतें, यामुळें त्याची पूर्ण खात्री झाली कीं, तिनें जी वर्तणूक केली, ती फक्त आपल्या आज्ञेंत रहावें आणि आपलें मन संतुष्ट ठेवावें, इतक्याकरितांच केली, दुसरें कांहीं कारण नाहीं. राजानें दोन्ही मुलांचा नाश केला, असें सर्व लोकांस वाटलें, आणि तो मोठा नीच व दुष्ट आहे, असें ह्मणून त्यांणीं त्याची पराकाष्टेची निर्भर्त्सना केली. राजपत्नीविषयीं तर त्यांना फारच करुणा येऊं लागली. तिच्या मैत्रिणी तिजकडेस येऊन तिच्या मुलांविषयीं दुःख करूं लागल्या ह्मणजे तिणें इतकेंच ह्मणावें कीं "मजकडे काय आहे? ज्या सभाग्यानें त्यांना जन्म दिला, तो त्यांचें पाहिजे तें करण्यास सर्वस्वीं मालक आहे,"

याप्रमाणें आणखी कांहीं वर्षें गेल्यानंतर त्या निर्दय राजानें तिच्या सहनशीलतेच्या परीक्षेचा शेवट करण्याचा निश्चय केला; आणी पुष्कळ लोकांसमोर तो उघडपणें ह्मणाला कीं, "मी पोरकटपणानें इच्याशीं लग्न केलें, हा माझा मोठा मूर्खपणा झाला; याकरितां हिला राणीपणा देऊन महालांत न ठेवितां, हिला घालवून देऊन दुसरी स्त्री करण्याचा माझा मनोदय आहे." ह्या अशा निष्ठुर भाषणामुळें लोकांनीं त्यास पुष्कळ दूषणें लाविलीं, परंतु दुसरें कांहीं न बोलतां, "असेंच करायाचें," हें तो धरून बसला; हें ऐकून पूर्वींप्रमाणें आपल्यास बापाच्या एथें जाऊन गुरें राखावीं लागतात अशी तिची खात्री झाली; आणि तिला वाटलें कीं "मी ज्यावर अंतःकरणपूर्वक इतकी प्रीति करितें, त्याला कोणी दुसऱ्या स्त्रीनें वश करून घेतलें असावें, आणखी तिला आपला मत्सर उत्पन्न झाल्यामुळें राजासही आपला कंटाळा आला असावा." असें जरी तिला भासलें, तरी तिणें दृढ निश्चय केला कीं, 'ज्यापक्षीं प्रारब्धाच्या गतीमुळें ओढवलेले पूर्वींचे दोन भयंकर प्रसंग आपण सोसले त्या पक्षीं दगडाचें काळीज करून हा ही प्रसंग तसाच सोसावा.' याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यावर राजानें एके दिवशीं सर्वांदेखत तिला बोलावून आणिलें; आणि तिला ह्मटलें, "पूर्वीं पासून माझे पूर्वज मोठमोठे पराक्रमी असून त्यांणीं पृथ्वीचें राज्य चालविलें; आणि तुझे पूर्वज सर्व दरिद्री नांगरे; याकरितां यापुढें तूं आमच्या महालांत न राहतां, आपल्या बापाच्या घरून जें कांहीं तूं आणिलें होतेंस तें तुझें तुला घे, आणि परत जा. माझ्या

योग्यतेस शोभण्याजोगी दुसरी स्त्री मी करणार" हें ऐकतांच तिचें अंतःकरण विरघळून गेलें. परंतु मोठ्याच प्रयत्नानें तिनें डोळ्यांतून आसवें गळूं दिलीं नाहींत; ती ह्मणाली "महाराज, आपली पदवी आणि राजवंश यांची बरोबरी करण्यास माझी नीच स्थिति अगदीं अयोग्य आहे, हें पूर्वीपासून मी जाणतें. मी अशा मोठ्या पदवीस चढलें हे परमेश्वराचे आणि आपले मजवर मोठे उपकार आहेत. ती पदवी चार दिवसपर्यंत आपण मला दिली, परंतु आतां आपणांस ती परत घेण्याची इच्छा झाली; याकरितां मनांत कांहीं खेद न मानितां, मीही आपल्या इच्छेप्रमाणें आपली पदवी आपल्या स्वाधीन करितें. ही वाग्निश्चयाची अंगठी, ही आपली घ्यावी. आतां, मी जो हुंडा आणला असेल, तो परत घेऊन जाण्या ची आज्ञा झाली; त्यास, तो ह्मणजे मोजण्यास कोणी सराफ आणला पाहिजे असा अर्थ नाहीं; किंवा तो भरावयास मोठा थैला आणिला पाहिजे असेंही नाहीं; मग लादून नेण्यास एखाद्या तट्टाची गरज लागेल हें ह्मणणे तर लांबच. कारण आईच्या उदरांतून जशी मी उपजलें, तशीच नग्न आणून माझा आपण अंगीकार केला, हें मी अद्याप विसरलें नाहीं; तेव्हां ज्या देहापासून आपणांस दोन मुलें उत्पन्न झालीं, तो देह चौघांच्या दृष्टीसमोरून उघडा पाठविणें आपल्यास जर प्रशस्त वाटलें, तर मग मलाही ती गोष्ट मान्य आहे. परंतु माझी एक विनवणी आहे ती अशी कीं, मी येते वेळीं कुमारीपणानें एथें आलें होतें, तो माझा कुमारीपणा आपल्या स्वाधीन झाल्यामुळें परत नेण्यास मजपाशीं

राहिला नाहीं. तेव्हां कृपा करून त्या माझ्या कुमारीपणाच्या बदलीं तरी, एक जीर्ण वस्त्र माझी लाज राखण्याकरितां, माझ्या हुंड्यावर अधिक द्यावें." हें ऐकतांच त्याला एकदम मोठा हुंदका आला; तथापि तो आंतल्या आंत दाबून मोठ्या निष्ठुर मुद्रेनें तो ह्मणाला, "तर मग एकच मात्र वस्त्र तुला मिळेल." सर्व लोकांनीं राजाची पुष्कळ विनवणी केली कीं, 'आज बारा चवदा वर्षेंपर्यंत आपण जिला ठेवून घेतलें, तिला एक जुनेंच परंतु धड तरी वस्त्र द्यावें!' परंतु व्यर्थ. शेवटीं तशा दीनवाण्या स्थितीनें राजवाडा सोडून ती रडत आपल्या बापाच्या घरीं गेली; व याप्रमाणें तिची ही दुःखकारक स्थिति पाहून सर्व लोकांस मोठा खेद उत्पन्न झाला.

इकडे, आपल्या मुलीस फार दिवसपर्यंत राजा आपल्या घरीं ठेवून घेईल, असें त्या गरीब शेतकऱ्याचे मनांत मुळींच आलें नव्हतें; कधींना कधीं तरी तिला परत यावें लागेल, असें त्यानें पक्कें जाणून तिचीं लहान थोर जुनीं पानीं सर्व वस्त्रें, तिचें लग्न करून दिल्या दिवसापासून, मोठ्या बंदोबस्तानें ठेविलीं होतीं. ही तिकडे जातांच त्यानें तिला तीं आणून दिलीं. तीं घेऊन ती नेसली, आणि विपरीत प्रारब्धाचा हा भयंकर तडाखा पराकाष्ठेच्या मोठ्या धैर्यानें सहन करून, पूर्वीप्रमाणें आपल्या बापाच्या घरीं काबाडकष्ट करून दिवस घालवूं लागली. नंतर कांहीं दिवसांनीं राजानें, आपण दुसरें लग्न करणार असें वर्तमान उठविलें. आणि मोठ्या समारंभाचा डौल घालून, शांतशीलेस बोलावून आणिलें; आणि तिला ह्म-

णाला—" मी एका राजकन्येशीं लग्न लावण्याचा निश्चय केला आहे. प्रथमच ती घरीं आणावयाची, यासाठीं तिचा उत्तम प्रकारें सन्मान ठेविला पाहिजे; लग्नसमारंभाचा सर्व बेतबात यथास्थित झाला पाहिजे; व आल्यागेल्या स्त्रियांचा समाचार घेतला पाहिजे; परंतु अशा कामाची निभावणी करण्याजोग्या पोक्त स्त्रिया एथें कोणी नाहींत हें तुला ठाऊकच आहे. घरची सर्व व्यवस्था तूं उत्तम प्रकारें जाणतेस. तर तुला योग्य वाटेल त्याप्रमाणें तूं सर्व साहित्याची तयारी ठेव, आणि तुझ्या इच्छेस येईल त्या सर्व स्त्रियांस आमंत्रणें कर; सारांश, घरच्या धनिणीप्रमाणें चार दिवस समारंभ साजरा करून, लग्न आटोपतांच पुनः तूं आपल्या बापाचे एथें निघून जा." हे शब्द बाणाप्रमाणें तिच्या हृदयांत भेदले; तथापि जशी तिणें आपल्या धनदौलतीची आशा सहज सोडिली होती, तशी राजावरील प्रीति तिच्यानें तोडवेना. ह्मणून ती ह्मणाली, "महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणें वागण्यास मी सिद्ध आहें." नंतर, ज्या वस्त्रानिशीं ती राजवाड्यांतून बापाच्या घरीं गेली होती, तें फाटकें वस्त्र नेसलेली तशीच, राजवाड्यांत शिरली, आणि तिनें एखाद्या नीच दासीप्रमाणें आपल्या हातानें सर्व राजमहाल झाडून, सर्व वस्तु घासूनपुसून एकंदर तयारी ठेविली. जसा थाटमाट असावा तसा उतरे तोंपर्यंत तिनें मन अगदीं उदास न करितां, खटपट केली, आणि स्वयंपाकाची सुद्धां तयारी करविली, आणि नेमलेल्या मुहूर्तास तशा त्या दरिद्री वस्त्रांनिशींच मोठ्या आनंदानें व संभावितपणानें तिनें सर्वांचा आदरसत्कार केला.

इकडे, सुधन्वा राजानें मोठ्या काळजीनें सत्यपुरामध्यें किल्ल्यावर उभय मुलांची जोपा उत्तम प्रकारें ठेवविली होती, असें मागें सांगितलेंच आहे. या वेळीं त्या मुलीचें वय बारावर्षांचें व मुलाचें सहा वर्षांचें झालें होतें. मुलगी स्वरूपानें तर इतकी सुंदर होती कीं, अशी स्त्री लोकांच्या पाहण्यांत क्वचितच आली असावी. नंतर पूर्वींच्या त्या विश्वासू चाकरास एकंदर सिद्धता करून देऊन सत्यपुरास पाठविलें. तो सर्वांस रस्तोरस्तीं लग्नाचें आमंत्रण देऊन मोठ्या डामडौलानें त्या उभयतांस घेऊन आला; परंतु त्यानें खरा वृत्तांत कोणासही कळूं दिला नाहीं. इकडे राजधानींतील सर्व लोक मोठ्या आनंदानें आपली नवी धनीण पाहण्याकरितां तटस्थ उभे होते. इतक्यांत राजवाड्यांतील सर्व स्त्रिया सामोऱ्या गेल्या आणि मोठ्या आनंदानें या नवरीचें सन्मानपूर्वक योग्य आगतस्वागत करून तिला राजमहालाच्या शेजारच्या बंगल्यांत घेऊन आल्या. इतक्यांत शांतशीला तशा त्या दरिद्री वस्त्रांनिशींच मोठ्या आनंदानें जाऊन तिला भेटली, आणि ह्मणाली,—"बाईसाहेब, आपण आलां ही फारच संतोषाची गोष्ट झाली." शांतशीलेची ती करुणा येण्याजोगी स्थिति पाहून सर्व स्त्रियांस फारच वाईट वाटलें; आणि या वेळीं तिला एकीकडे एका खोलींत बसवून ठेवून, परक्यांच्या दृष्टीस पडूं देऊं नये, किंवा तिला तिच्या पूर्वींच्या वस्त्रांपैकीं एकादें तरी वस्त्र द्यावें, ह्मणून तेथील सर्व स्त्रियांनीं राजास मोठीच भीड घातली, परंतु राजानें कांहींच मान्य केलें नाहीं. इकडे नवरी पाहून सर्व लोकांस सानंदाश्चर्य होऊन

ते ह्मणूं लागले कीं, राजानें दुसरी स्त्री केली खरी, परंतु चांगलीच केली यांत संशय नाहीं. शांतशीलेनें तर त्या उभय बहीणभावंडांची फारच तारीफ केली. हें पाहून राजाची पुरी खात्री झाली कीं, "आतां ह्मणून हिच्या स नशीलतेची परीक्षा करण्याची कांहीं बाकी राहिली न हीं; कोणत्याही प्रकारें कितीही जरी हिचा छळ केला, त ी हिची स्थीरता कदापि ढळणार नाहीं. हिणें जें हें सर्व दुःख सोशिलें तें कांहीं शाहाणपणा नसल्यामुळें सोशिलें असें नाहीं; कारण, तिचा विचारी स्वभाव पूर्वींपासून आपणास माहीत आहे." सारांश, तिच्या आचरणावरून त्या कठोर राजासही अशी सद्बुद्धि उत्पन्न झाली कीं, "आतां हिचा छळ पुरे करावा; हिची मुखचर्या जरी शांत आणि स्थिर दिसते, तथापि हिणें आपली हृद्रोगव्यथा जी अंतःकरणामध्यें दाबून ठेविली आहे, त्या व्यथे-पासून हिला आतां मुक्त करावें." असें त्याणें मनांत आ-णिलें, आणि सर्वांसमोर बोलावून आणून तो हास्यमुखानें तिला ह्मणाला, "शांतशीले, नवी राणी कशी काय आहे? तुला ती आवडलीना?" तेव्हां ती ह्मणाली, "महाराज, मला ती फारच आवडली; आणि जशी ती सुंदर आहे, तशीच जर ती विचारी असली, तर आपणांसारिखा सुखी दुसरा कोणीही मिळणार नाहीं; परंतु मी मोठ्या नम्रतेनें आपणांस एक विनवणी करितें कीं, ही फार सुकुमार असून, आपल्या पहिल्या स्त्रीला जशी बालपणापासून दुःखें सोसण्याची सवय होती तशी हिला नाहीं; केवळ श्रीमं-तीच्या आणि लाडुकपणाच्या सुखांत ही वाढलेली आहे.

याकरितां अंतःकरण भेदण्याजोग्या गोष्टींची पहिल्या स्त्रीपाशीं जशी आपण योजना केली, तशी मात्र कृपा करून इजपाशीं करूं नये." प्रत्यक्ष ही नवीन मुलगी आपली सवत होण्याकारितां आली आहे, व तिचें वैभव डोळ्यांसमोर पाहून आपणास भिकाऱ्याप्रमाणें दिवस काढिले पाहिजेत, हें जाणत असतांही शांतशीलेनें इतक्या नम्रपणानें व निःष्कपटपणानें असें मनोहर भाषण केलें, हें पाहून राजा गहिंवरला, आणि त्यास आपल्या कृत्याचा पश्चात्ताप होऊन तो तिला प्रीतीनें जवळ बसवून घेऊन ह्मणाला; " प्रिये, शांतशीला हें नांव तुला फारच शोभतें. दीर्घकाळपर्यंत जी तूं सहनशीलता धरलीस, तिचें आज उत्तम फळ घेण्याची तुला ही वेळ आली आहे. लोकांनीं मला अन्यायी, दुष्ट, आणि राक्षसाप्रमाणें क्रूर ठरविलें होतें; परंतु मी आजपर्यंत जें कांहीं केलें तें स्त्रीनें पतीपाशीं कसें वागावें हें स्त्रियांस समजावें, आणि शेवटीं, लग्न केल्यापासून जे भयंकर अनर्थ घडण्याची भीति मला वाटत असे, ते अनर्थ दूर होऊन, आपण उभयतां जीवंत असूं तोंपर्यंत सुखानें आणि शांतीनें आपले दिवस जावे, इतक्याकारितां करीत आलों. तुझ्या गुणांची परीक्षाच करण्याच्या उद्देशानें जरी मी तुजशीं इतकी कठोर आणि त्रासदायक वर्तणूक केली, तथापि माझ्या इच्छेच्या विरुद्ध, भाषण किंवा आचरण तूं केव्हां एकदा तरी केलेंस, असें मला किंचित्‌ही स्मरत नाहीं; यावरून जें संसारसुख मी इच्छीत होतों, तें मला प्राप्त झालें यांत संशय नाहीं. तस्मात् ज कांहीं मी तुजपासून पुष्कळ वर्षांमधें हिरावून घेतलें आहे,

तें सर्व तुला एक क्षणांत परत द्यावें, आणि आजपर्यंत जीं दुःसह आणि भयंकर दुःखें मी तुला भोगावयास लाविलीं, त्यांबद्दल आतां सहस्रपट अधिक सुख देऊन परिणाम गोड करावा, अशी मला इच्छा उत्पन्न झाली आहे. ही मुलगी, जिला तूं माझी स्त्री असें समजली आहेस ती, आणखी हा तिचा बंधु, हीं दोन्ही तुझीं आणि माझीं बाळकें; जीं सुकुमार मुलें मी क्रूरपणानें ठार मारिलीं असें तूं समजली होतीस आणि इतर लोकही समजले होते, तींच हीं! आणि स्त्रीसुखाविषयीं मजहून भाग्यवान् प्राणी या त्रिभुवनांत कोणी मिळणार नाहीं अशी ज्याची खात्री जाहली आहे, आणि सर्व वस्तूंपेक्षां तुजवर ज्याची अधिक प्रीति आहे असा हा मी तुझा नवरा; या सर्वांचा अंगीकार कर." असें बोलून तिच्या गळ्यास मोठ्या प्रेमानें त्यानें मिठी घातली; तिच्याही नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले. आणि तशा त्या आनंदानें तीं उभयतांही, जेथें आपली मुलगी बसली होती तेथें जाऊन, तिला व तिच्या भावाला प्रीतीनें आलिंगन दिलें. हें पाहून ती मुलगी चकित झाली. तेव्हां तें गूढ फोडून सर्व वृत्तांत त्या मुलीस व तेथील सर्व लोकांस कळविला. त्याबरोबर सर्व स्त्रिया एकाएकीं आनंदानें उठल्या, आणि चिंध्या नेसली असतांही जी राणीप्रमाणें शोभणारी शांतशीला, तिला आंत नेऊन तिचीं सर्व राजकीय मौल्यवान वस्त्रें तिला नेसवून मोठ्या गंभीरपणानें तिला राजमहालांत घेऊन आल्या; आणि याप्रमाणें शेवट गोड झाल्यामुळें सर्व लोक अतिशयित संतुष्ट झाले; मुलगा मुलगी पाहून तर सर्व प्रजेस अत्यानंद झाला. नंतर पुष्कळ

दिवसपर्यंत आनंदोत्सव चालला. राजानें आपल्या स्त्रीचा पराकाष्टेच्या कठोर व दुःसह रीतीनें छळ केला ह्मणून त्यांस दुःख वाटलें, तथापि त्याच्या चतुरायीची त्यांणीं बरीच स्तुति केली; पण शांतशीलेविषयीं ह्मटलें तर तिला उपमाच उरली नाहीं. नंतर राजानें आपल्या श्वशुरास दरिद्रापासून मुक्त करून राजवाड्यांतच आणून ठेविलें. आपल्या मुलीचें एका सुशील राजपुत्राशीं लग्न करून दिलें. आणि याप्रमाणें सर्व जणें दीर्घकालपर्यंत संसारसुखाचा आनंदानें उपभोग घेऊं लागलीं.

असो. या गोष्टीवरून आतां आपण काय बरें ह्मणावें? इतकेंच कीं, ईश्वरी करणी अगाध आहे. तो एखाद्या कोनाकोपऱ्यांत पडलेल्या प्राण्यावरही सद्गुणांची प्रेरणा करितो; आणि मोठ्या राजकुटुंबामध्येंही असे पुरुष उत्पन्न होतात कीं, मनुष्यांवर राज्य चालविण्यापेक्षां गाढवें राखण्याचा धंदा दिल्यास त्यास ते विशेष योग्य होतील. अहाहा! शांतशीलेशिवाय दुसऱ्या कोणत्या बरें स्त्रीच्या हातून अशीं कृत्यें घडलीं असतीं? अहो, जिणें डोळ्यांतून अश्रु काढायाचें नाहीं ह्मटलें असतां प्रतिज्ञेनें काढलें नाहीं तें नाहींच; पण आणखी, जिच्या लहरी व हट्टी नवऱ्यानें आपल्या स्त्रीचा आज्ञांकितपणा कोठपर्यंत टिकाव धरतो इतकेंच केवळ पाहण्याच्या पोरकट इच्छेनें, कांहीं योग्य कारणाशिवाय, पराकाष्टेचा कठोर आणि कधीं कोणी ऐकिला नाहीं असा छळ केला असतांही, तिणें सदासर्वदा आनंद दाखवून तें सर्व सहन केलें, हें लहान कृत्य काय? पुष्कळ स्त्रिया अशा सांपडतील कीं,

जर त्यांना या रीतीनें उघडें नागवें करून घरांतून लावून दिलें असतें, तर आपल्या नवऱ्याचें नाक ठेंचून आपणांस व त्यासही पुरून उरण्याजोगीं सुंदर वस्त्रें मिळविण्यास त्यांणीं उशीर लावला नसता.

असो; धन्य ती शांतशीला! तिचा कित्ता सर्व स्त्रियांनीं घ्यावा हें त्यांस उत्तम भूषण आहे; परंतु एथें सर्व पुरुषांस इतकी सूचना करणें योग्य आहे कीं, सुधन्व्याच्या अयोग्य कृत्याचा परिणाम जरी शेवटीं चांगलाच झाला, तथापि त्याच्या आचरणाचा कित्ता घेण्याच्या खटपटींत कदापि कोणी पडूं नये.

---

## स्त्रीक्रोधाचें सांत्वन.

**उमा**—काय त्रास तरी हा! किती ह्मणून सोसावें! जेव्हां पहावें तेव्हां हीच गत! घरीं येण्याची फुरसत! उचलली जीभ लावली टाळ्यास! हें दुःख माझ्यानें नाहीं काढवत बाई! पुरे हा संसार आणि पुरेत हे उपचार! माझा जीव बाई त्रासून गेला! दिवसभर वर्मीं बोलणें! एकदां झालें, दोनदां झालें, आला दिवस हीच किरकिर! बाहेर त्रासावें आणि मला बोलावें! वड्याचें तेल वांग्यावर! काय तरी हाल हे! यापेक्षां मरण बरें! नको नको हें सुखदुःख! मी ह्मणून इतके दिवस काढले; दुसरीच्यानें क्षणभरही राहवलें नसतें! मग यांना सर्व सुखाचा भोंपळा समजला असता! फुणफुण ह्मणून किती काढावी! सर्वादिवस काम करून मेलें, तरी यांचें ह्मणून बोलणें

आहेच! व्यर्थ बायकांचा जन्म! भगवंता, नको हें दास्य! मी अगदीं थकून गेलें! मला एक वेळ यांतून सोडीव!

रमा—अग उमा! तुझी अवस्था अशी झाली तरी काय! छी छी, हें नीट नाहीं. कपाळास धमकावणीच्या कठोर आंठ्या घातल्या आहेस त्या उकलून टाक. सर्वस्वी तुझा सांभाळकर्ता, तुझा स्वामी, तुझा प्राणनाथ, यांस त्या उग्र नेत्रांतून भाले मारून दुखापत करूं नको. तूं कितीही लावण्याची खाण असलीस, तरी थंडीच्या कडाक्यामुळें वृक्षांचे कोमल पल्लव जसे करपटून जावे, तसें तुझें लावण्य तुझ्या तिरस्कारी स्वभावामुळें करपटून जात आहे. वावटळ सुटली ह्मणजे पुष्पांच्या सुकुमार कळ्यांचा जसा विध्वंस होतो तसा तुझ्या लौकिकाचा विध्वंस होत आहे. कोणत्याही तऱ्हेनें त्यापासून हित किंवा मनास आनंद व्हावयाचा नाहीं. बायकांना राग आला ह्मणजे त्यांची स्थिति कशी होते? तर, जसा सुंदर पाण्याचा झरा खरा, पण अतिशय गढूळ झालेला, चिखलानें भरलेला, ओंगळ, ज्यांत सुरेखपणा ह्मणून किंचितूहि नाहीं, अशाच प्रकारची होय. कारण, जसा तो झरा गढूळ आहे तोंपर्यंत मनुष्यास तृषा कितीही लागली, कितीही त्याचा कंठ शोषला, तरी त्यांतील एका थेंबालाही शिवण्यास त्याचें मन घेणार नाहीं, त्याप्रमाणेंच बायकांची गोष्ट आहे. तुझा नवरा तोच तुझा स्वामी, तुझा जीव, तुझा संरक्षक, तुझा धनी, आणि तुझा राजा. तुझी काळजी त्याला किती आहे पहा बरें. तुझ्या पोटाची भर करण्याकरितां, आपल्या अमोलिक शरीराचे हाल करून, तो समुद्र ह्मणत नाहीं, पर्वत

ह्मणत नाहीं, पाऊस ह्मणत नाहीं, ऊन्ह ह्मणत नाहीं, अरण्य ह्मणत नाहीं, तुजकडे जीव लावून वादळामध्यें रात्रीच्या रात्री जागरणें काढतो, दिवसभर थंडीवाऱ्यांतून कुडकुडतो, उन्हाचे ताप सोसतो; आणि तूं इकडे आनंदानें खुशाल घरीं बसून मौजा मारितेस. बरें इतकेंही असून तो तुजकडे कांहीं जास्त मागत नाहीं; पण प्रेम ठेवावें, कपट न धरितां हास्यमुख असावें, आणि सांगितलेलें तेवढें काम मन लावून करावें, हें काय तें त्याचें मागणें! त्याच्या एवढ्या मोठ्या कर्जाची फेड होण्यास, त्यापुढें तुझें हें देणें कांहींच नाहीं. राजाकडे भक्तीनें वागण्याचा जसा प्रजेचा धर्म आहे, तसाच पतीपाशीं प्रीतीनें वागण्याचा स्त्रीचा धर्म आहे. असें असतां, सात्विकपणानें जें कांहीं तो सांगतो, तें घुम्मेपणा आणि हट्ट धरून, तुमच्या करनकरे स्वभावानें जर ती ऐकत नाहीं, तर ती बायको कसली? ती बायको नव्हे. पण भ्रष्ट, कज्जेदलाल, देवाधर्मानें टाकलेली, कोडगी, आपल्या मायाळू नवऱ्याच्या घरचा भेद बाहेर फोडणारी, विश्वासघातकी, कृतघ्न, राक्षसी होय. घरांत शांति ठेवण्याकरितां, पाय धरण्यास जें स्थान, जेथें प्रीति ठेवून सेवा करणें आणि आज्ञेंत राहणें हा आपला धर्म, अशा स्थळीं झूझ खेळण्यास उठणें, सगळी सत्ता आपल्या हातीं ठेवून हुकूम आणि तोरा चालविणें, अशा गोष्टींचा आपल्या बायकोजातीस मोठा आनंद, या गोष्टीची मला मोठी लाज वाटते. आमचें शरीर इतकें नाजूक, कोमळ आणि मृदु कशासाठीं बरें केलेलें आहे? पृथ्वीच्या पाठीवर फिरून,

काबाडकष्ट करावे कां बरें आह्मांस लागत नाहींत? आमच्या बाहेरच्या रूपासारखीच आंतील करणी आणि अंतःकरणही नाजूक असावें ह्मणून नव्हे काय? चला! चला! तुह्मी करनकऱ्या मूर्ख पोरी आहां! तुमच्या सारखीच मलाही, तोंडास तोंड देऊन हुमरीतुमरी करणें, . आणि चडफडण्यावर चडफडणें याची मोठी हौस असे. त्या गोष्टीचा मला मोठा आनंद वाटे. असल्या कामामध्यें माझ्या युक्ति आणि तर्क हे तुमच्यापेक्षांही अधिक होतील. पण, आतां माझी खात्री झाली ·आहे कीं, आमचे भाले ते त्यांना केवळ तृणासमान, आमची शक्ति ही तशीच निर्जीव. आमच्या इतक्या अशक्त कोणीच मिळणार नाहींत. आमचें सामर्थ्य उगीच अतिशय विशाळ दिसतें, पण, त्याचा लक्षावा हिस्साहि आमच्या आंगीं नाहीं. यासाठीं आपल्या मनांत ज्या गोष्टी तूं धरल्या आहेस, त्या सोडून दे; त्यांमध्यें कांहीं हित नाहीं; आणि नवऱ्याचे पाय धर. त्याला अडचण नसल्यास मीही आलें चल. त्याचा संतोष होऊं दे.

उमा—धन्य रमाबाई तुमचा उपदेश! तुह्मी आज भेटलां ह्मणून फार चांगलें झालें. अन्यथा माझा संसार बुडाला असता. (दोघी निघून जातात.)

---

## सुबोध संवाद.

[ लक्ष्मी, सरस्वती, सगुणा, आनंदी, आणि गोदावरी. ]

सरस्वतीच्या घरीं सर्व जणीं जेवायास आल्या होत्या. जेवणखाण झाल्यानंतर माडीवर बसल्या असतां,

**लक्ष्मी** ह्मणते—सरस्वतीबाई, मी ह्मणतें ह्मणून थट्टा समजूं नका; खरेंच बाई, तुमच्या घरीं आलें ह्मणजे जीव कसा तल्लीन होतो! तुमचें कामकाज, ठेवणें रेवणें जेथच्या तेथें पाहतांच, इकडून बाहेर जाऊंच नये असें वाटतें.

**सरस्वती**.—होय बाई, तुह्मी चौघी जणी दया करून आलां आहां, त्यांची जर वास्तपूस्त न ठेविली, तर आमच्या करण्याचें काय फळ? तरी पण तुमच्या जेवणखाणाची आह्मांकडून व्हावी तशी नीट व्यवस्था झाली नाहीं, याचा राग करूं नका ह्मणजें झालें.

**आनंदी**.—काय बाई, तुमचें बोलणें सुद्धां गोड. ऐकावेंसेंच वाटतें. हें तर काय, पण बाई तुह्मी गोष्टीही फार चांगल्या सांगतां. आतां इतक्यांत घरीं जाऊन तरी काय करायाचें आहे? वेळ सुद्धां जाणार नाहीं. पण तुमच्या गोष्टी ऐकल्या ह्मणजे प्रहराची घटका होते.

**सरस्वती**.—हो, गोष्ट तर गोष्ट. तुह्मीही ऐकिलें असेल कीं, परवां इकडे इंग्रजलोकांची एक बाई आली होती. तिणें या देशांतल्या अनेक मुलींच्या शाळा पाहिल्या, आणि नंतर आपल्या देशास जाऊन इकडलें सगळें वर्तमान छापिलें. त्या पुस्तकांत तिणें, आमच्या देशांतील बायका अज्ञानी, मूर्ख, आणि त्यांस समजूत उणी, आणखी असेच दुसरे कांहीं कांहीं पुष्कळ दोष काढिले आहेत; आणि ते नीट करावे ह्मणून सूचना केल्या आहेत, असें आमचा नाना ह्मणत होता.

**लक्ष्मी.**—होय, खरेंच तें! आमच्या देशांतल्या बायका मूर्ख आणि इंग्रजांच्या कायत्या शाहण्या!

**सगुणा.**—होय बाई. जो उठला तो आह्मांला मूर्ख आणि रानटी ह्मणतो. आतां त्यांच्या बायकांचें शाहणपण तरी आहे कितीसें, तें समजेल तर बरें होईल.

**सरस्वती.**—अहो सगुणाबाई, तुह्मींच ह्मणतां कीं जो तो दूषण लावतो ह्मणून. तेव्हां यावरूनच पहा कीं, कांहीं तरी मुळीं कारण असल्याशिवाय इतका गोंगाट होणार नाहीं. आतां ते ह्मणतात कीं, आह्मी तुरुंगांत ठेविल्यासारख्या घरांत कोंडून ठेविलेल्या असतों; आह्मांस विचार नाहीं; पुरुषांपेक्षां आह्मांस नीच मानतात. हीं जीं त्यांचीं दूषणें आहेत, तीं कांहीं सर्व गोष्टींनीं खरीं नाहींत. त्यांना आमच्या घरगुती वर्तणुकीची पुरती माहिती नाहीं; यामुळें ते तर्कानें जीं धोरणें बांधतात, तीं आपण विचार केल्याशिवाय खरीं मानतां नयेत. त्यांच्या बायका कोठें पाहिजे तेथें पुरुषांच्या मंडळींत जाऊन निर्धास्त बसतात, आणि आह्मी पुरुषांच्या मंडळींत जात नाहीं, यावरून त्यांना वाटतें कीं, आह्मांस घरांत कोंडून ठेविलेलें असतें. परंतु ही त्यांची समजूत खोटी आहे. कारण पुरुषांच्या मंडळींत जाऊन बसणें हें आमच्या रीतीप्रमाणें निर्लज्जपणाचें काम आहे. आणि स्त्रीजातीला जितका मर्यादशीलपणा तितकें अधिक भूषण. ते समजतात कीं, बायकांना मंडळींत नेण्यास आमच्या देशांतल्या पुरुषांस कमीपणा वाटतो. परंतु तसें नाहीं. कारण लग्नकार्यामध्यें, होमहवनामध्यें,

( ग्रांगे२९ )

मोठमोठ्या समारंभांमध्यें, सर्वदा पुरुषांपेक्षां स्त्रियांचा मान अधिक आहे. आणि कारणपरत्वें बायकांना पुरुषांच्या मंडळींत जेव्हां जावें लागतें, तेव्हां तेथें त्यांचा किती संभावितपणानें आणि मर्यादशीलपणानें पुरुष मान ठेवितात, हें तुह्मांला ठाऊकच आहे.

**आनंदी.**—स्त्रीजातीला जर आमचे पुरुष नीच मानीत नाहींत, तर मुलगा झाला ह्मणजे केवढा बरें समारंभ कारितात? त्यांना किती आनंद होतो? पण मुलगी झाली ह्मणजे त्यांना किती वाईट वाटतें बरें? पुरुषानांच वाईट वाटलें तरी आश्चर्य नाहीं. प्रत्यक्ष त्या मुलीच्या आईलाही मोठा खेद वाटतो. तेथें मग समारंभ कोठचा? मग आईची "सुटका तरी झाली," इतक्यावरच समाधान करून घेतात. तसेंच स्त्रियांना 'अवला,' 'भीरु,' आणखी असलींच दुसरीं नांवें देतात, हें कसें?

**सरस्वती.**—असें नाहीं. स्त्रीजात ह्मटली ह्मणजे मुळीं अशक्त, पराधीन आणि पुरुषांपेक्षां तिच्या अब्रूला धोके फार; यामुळें कन्या झाल्यापासून, पुढें ती कोणाच्या घरीं पडेल, तिचे अब्रूनें कसे दिवस जातील, इत्यादि काळजीमुळें मनास अमळ व्यथा होते इतकेंच. स्त्रीजातीला उणेपणा आहे ह्मणून असें होतें, असा अर्थ नाहीं. आतां 'अबला,' 'भीरु' हीं नांवें स्त्रियांना उणेपणा आणणारीं नव्हेत. पण उलट तिच्या नाजुकपणाला गौरव आणणारीं आहेत.

**आनंदी.**—पण इंग्रजांच्या बायका मोठ्या विद्वान असतात ह्मणून सांगतात, तें खरें काय?

**सरस्वती.**—होय, परवां आमचा नाना ह्मणत होता, कीं त्यांना आईच्या घरीं लहानपणापासून लिहिणें वाचणें, शिवणकाम इत्यादि शिकवीत असतात. त्यामुळें घरचा सगळा कामकारभार बायकांच्याच हातीं असतो. आणि पुरुषांना कांहीं तिकडे फारसें लक्ष द्यावें लागत नाहीं.

**आनंदी.**—आणि आमच्या घरचा आह्मी कामकारभार पाहतों कीं नाहीं?

**सरस्वती.**—हो; न पाहायाला काय झालें आहे? आमच्या देशांत तरी लाखों बायका अशा आहेत कीं, पुरुषांपेक्षां सुद्धां त्या संसारांत अधिक दक्ष असतात. पण त्या इंग्रजांच्या दृष्टीस पडत नाहींत, यामुळें त्यांना वाटतें, कीं हिंदूंच्या बायका अगदीं मूर्ख आहेत. पण ही एक गोष्ट खरी आहे कीं, आमच्या बायकांना लिहितां वाचतां येत नाहीं, आणि हिशेब समजत नाहीं, यामुळें त्यांच्या अंगांत तितकी हुशारी येत नाहीं. कोणत्या देशांतल्या बायका कशा शाहण्या किंवा मूर्ख आहेत; त्यांचे कोणकोणते गुण आपणांस घेण्याजोगे आहेत; त्यांच्या आंगीं किंवा आपल्या आंगीं कोणकोणते दोष आहेत; ते कसे काढून टाकावे; संसार ह्मटला ह्मणजे अडचणीचा समुद्र आहे, त्यांतून अबरूनें पार पडण्याला कशी वर्तणूक ठेविली पाहिजे; अशा प्रकारच्या पुष्कळ गोष्टी लिहितां वाचतां येत असलें ह्मणजे समजूं लागतात. आणि रिकामपणां झोंप घेण्यामध्यें वेळ न जातां, सत्कर्मामध्यें, पुराण कथा श्रवणामध्यें, तसेंच दुसऱ्या आणखी कित्येक

चांगल्या कामांमध्यें वेळ घालविण्यास सांपडतो, आणि मनाला समाधान होऊन बुद्धि वाढते. तेव्हां लिहिण्यावाचण्यामुळें त्यांचें ज्ञान अधिक असतें यांत संशय नाहीं.

लक्ष्मी.—पण, त्यांच्या बायकांची तब्बेत संभाळतां संभाळतां त्यांचे हाल फार होतात असें ऐकतों, हें खरें काय?

**सरस्वती.**—होय, आमचा नाना असें ह्मणत होता खरा. त्यांच्यांतील किती एक बायका अशा मिजाशी आणि उद्धट असतात कीं, त्यांचा खर्च संभाळतांना नवऱ्यांची त्रेधा उडून जाते. आणि याकरितां कित्येक लोक या त्रासाला भिऊन लग्न न करितां तसेच राहतात. विद्वान ह्मणवून घेणाऱ्या बायकांना ही मोठी शरमेची गोष्ट आहे. परंतु सगळ्याच अशा नाहींत; आणि मी ह्मणतें कीं, वाईट चाल जी असेल ती सर्वांनीं सोडून द्यावी हें चांगलें आहे.

**सगुणा.**—सरस्वतीबाई, लिहिणें वाचणें शिकल्यानें अमक्या तमक्या गोष्टी होतील ह्मणून तुह्मी सांगतां खऱ्या; परंतु त्या गोष्टी काय पहिलें पुस्तक आणि दुसरें पुस्तक वाचून होणार आहेत? आमच्या मुंबईच्या मुली, कोठें ट फ वाचतां येऊं लागलें, ह्मणजे कोठचां "प्रीताईचीं बुकें" ह्मणून वाचूं लागतात. जळोत तीं बुकें! त्यापेक्षां मुळींच वाचतां न येईल तर बरें. ह्मणूनच पुरुष ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं, कीं बायकांना लिहितां वाचतां आलें ह्मणजे परिणाम वाईट होतात ह्मणून.

**सरस्वती.**—असलीं वाईटसाईट पुस्तकें वाचल्यानें परिणाम वाईट होईल खरा. परंतु हा कांहीं लिहिण्या-

वाचण्याचा दोष नाहीं. त्यांना त्यांच्या घरच्या मनुष्यांनीं चांगलीं पुस्तकें आणून द्यावीं. आणि वाईट असतील तीं वाचूं देऊं नयेत. त्यांपासून अनहित आहे असें त्यांच्या मनांत ठसवून द्यावें. असें केलें ह्मणजे तुह्मी ह्मणतां ती अडचण राहणार नाहीं. काय करावें बाई, आमच्या बायकाच मूर्ख ह्मणून कशाला ह्मणावें? नानानें सांगितलें कीं, फक्त बायकांच्या वाचनाकरितां, इंग्रजांच्या देशांत सोपीं, गोड, आणि सुबोधपर हजारों पुस्तकें नित्य नवीं छापतात. तसलीं पुस्तकें आह्मांला कोठें बरें मिळतात? तींच आमच्या देशांतल्या पुरुषांनीं करून दिलीं, तर आह्मी वाचूं कीं नाहीं? आह्मांला वाचायालाच जर पुस्तकें नाहींत, तर लिहिणें वाचणें शिकून इंग्रजांच्या बायकांप्रमाणें नवीं नवीं पुस्तकें आह्मी करायाचीं तीं कशीं?

**लक्ष्मी.**— होय हो बाई, बरी आठवण झाली. मागच्या सोमवारीं मी आमच्या यमुनाबाईच्या घरीं गेलें होतें, तेथें तिचा नवरा कशावरूनसा तिला ह्मणाला कीं, "तुह्मी बायका मूर्ख, तुह्मांला लिहितां येत नाहीं, वाचतां येत नाहीं. ह्मणूनच इंग्रज लोक हंसतात ते." तेव्हां ती ह्मणाली, "लिहितां येऊन काय उपयोग? वाचायाला पुस्तकच नाहीं. इतक्या कसल्याशा 'यमये' आणि 'बीये' ह्मणून परीक्षा दिल्या आहेत, आणि रोज रोज भाराभर इंग्रजी पुस्तकें आणून वाचायाचीं, पण बायकांसाठीं दोन चार पुस्तकें केलीं तर काय होईल?" तेव्हां तो रागावून तिला ह्मणाला, "चल, वेड लागलें आहे तुला. मराठी येतें

आहे कोणाला इथें! आणि पाहिजे तरी तें कशाला! इंग्रजी शीक, आणि हवीं तितकीं मग पुस्तकें वाच."

गोदावरी.— बरें बाई, काय करायाचें त्याला! मराठी झालें, आतां इंग्रजी उरलें आहे!—पण बोलतां बोलतां केव्हांच सांज झाली. आतां आह्मांला आज्ञा द्यावी.

लक्ष्मी.—बोलतां बोलतां किती गोष्टी निघाल्या पहा! तुमच्या मुखांतून निघालेलें इतकें सुरस भाषण ऐकून आह्मांला मोठा आनंद झाला. याकरितां फावल्या वेळेस अशाच आपल्या एथें घटकाभर गोष्टी बोलण्याकरितां आलों तर आपणांला त्रास तर होणार नाहींना!

सरस्वती.—मला तर बाई एकटी बसून बसून कंटाळा येतो. तुह्मी वरचेवर येत जाल तर करमणूक तरी होईल.

लक्ष्मी.—बरें आहे.

( सर्व निघून जातात. )

---

## स्त्रीचें तेज.

घरांतील चांगल्या वाईट कृत्यांमध्यें स्त्रीचें तेज ह्मणून जें आहे तें दुर्निवार आहे. तथापि तें जर मुळींच नसतें, तर मनुष्याला संसारसुखाचा लेशही प्राप्त झाला नसता!

चांगली स्त्री हाच पुरुषाचा शाहणपणा, सामर्थ्य, आणि धैर्य होय; वाईट स्त्री हीच कटकट, वाईट कामाला प्रवृत्ति, आणि निराशा. मनुष्य कोणच्याही स्थितींत असला तरी त्याची स्त्री जर मनाची स्थिर, निश्चयी, आणि मितव्ययी आहे, तर त्याला धैर्य सोडण्याचें कार-

ण नाहीं. पण घरामध्यें जर आलस्य, उधळेपणा, आणि अव्यवस्था आहे, तर बाहेरून कितीही शहाण-पणाचा व्यवहार ठेवला, तरी कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. कोणाच्याही हातून वाईट स्त्रीचा फार दिवस त्रास सोसणें होणार नाहीं. पुरुषाचें मन घट्ट असलें तरी तें कांहीं दगडाचें केलेलें नाहीं. त्याला मोठमोठे उद्योग आणि पराक्रम करण्याची हौस असते खरी; तरी हें सर्व सिद्धीस जाण्याला त्याचें मन शांत असलें पाहिजे. ह्मणून जर तो चांगला बुद्धिमान व चतुर मनुष्य असला, तर विशेषें करून त्याला संसाराच्या धक्काधक्कींतून पार पडण्याला सुविचाराचें अंग बरेंच अवश्य आहे. त्याच्या त्रासलेल्या जीवाला विश्रांति देण्याला घर ह्मटलें ह्मणजे गोडीगुलाबीचें आणि समाधानाचें स्थान असलें पाहिजे. अशा स्थानीं तो आला तर त्याच्या अंतरात्म्याला आ-ल्हाद होऊन दुप्पट बळ येतें, आणि पुन्हा संसाराच्या खटपटीसाठीं बाहेर जाण्याला त्याला ताजी हुशारी उत्पन्न होते. पण घरींच जर शांति मिळत नाहीं, आणि सदा-सर्वदा हुसफुस, आणि फडफडाट, आणि जळफळाट आणि तुसडेपणा, आणि हेवा, आणि घिसघीस, यांशीं गांठ झाली; फिर्यादी आणि, गाऱ्हाणीं आणि निंदा, यांची टोंचणी सुरू झाली; तर त्याची छाती खचून जाते, आणि बिचाऱ्याची सर्वस्वीं निराशा होते. ज्याला सं-साराची फारशी काळजी नाहीं, अशाही अनेक लो-कांची अशीच स्थिति आहे. याचें कारण स्त्रीचें तेज.

# मुलांचें शिक्षण.

——00——

मुलांचा आईवर जसा विश्वास असतो तसा दुसऱ्या कोणावरही नसतो. नवीन कोणतीही वस्तु त्यांच्या नजरेस पडो, तिजविषयीं हरएक प्रकारची माहिती आईच्या मुखावाटे मिळाल्याविना तीं कधींही संतुष्ट होत नाहींत. दुसऱ्या मनुष्यांनीं त्यांची कितीही समजूत केली तरी त्यांची खात्री होत नाहीं. मुलांचा नेहेमी आईशीं सहवास असल्यामुळें, व तिची त्यांवर पूर्ण कृपा असल्यामुळें, आपणांस आई कांहीं असत्य किंवा आपलें अहित होण्याजोगें सांगणार नाहीं, अशी त्यांची तिजवर पूर्ण श्रद्धा असते. याकरितां मुलांना सन्मार्गीं लावण्याच्या कामीं आईचे प्रयत्न जसे सफळ होतील, तसे दुसऱ्या कोणाचेही होणार नाहींत, हें उघड आहे. असें जरी आहे, तरी कित्येक स्थळीं, आईच्या उपदेशानें मुलें सुधरतात असें न ह्मणतां तिच्या वेडगळ आणि असमंजस लाडानें तीं फार बिघडतात, असें ह्मणण्यास कांहीं बाध आहे, असें आह्मांस वाटत नाहीं. बाप, चुलते, किंवा वडील भाऊ, यांची मर्जी सुप्रसन्न असल्यास त्यांजकडून कधींतरी मुलांस थोडा बहुत उपदेश मिळतो. परंतु त्यांवर त्यांची पूर्ण श्रद्धा नसल्यामुळें त्याचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. तशांत कांहीं कांहीं ठिकाणीं त्या उपदेशाप्रमाणें न चालण्याविषयीं आईकडून त्यांस शिफारस होते, व कितेक ठिकाणीं तर मुलांना अधिकउणें न बोलण्याविषयीं मुलाच्या बापास आईकडून सक्त ताकीद होते. असा

हुकूम झाला ह्मणजे मग तो मोडावा कोणी! असो. अशा रीतीनें मुलांच्या शिक्षणाकडे अगदीं दुर्लक्ष होतें, एवढेंच नाहीं, तर मुलांची बुद्धि कुमार्गी लावण्यास तीं आईबापें कारण होतात. लहानपणीं, मूलस्वभावास्तव नाऱ्या जर एखाद्या लहानशा मांजराच्या अगर कुत्र्याच्या पोराची शेपटी धरून ओढूं लागला, किंवा दुसऱ्या प्रकारानें त्यास त्रास देऊं लागला, तर त्याच्या आईस जसे कांहीं प्रेमाचे पाझर सुटतात. ते मुलाचे खेळ पाहून तिचा तो आनंद पोटांत माईनासा होतो. आसपास कोणी असल्यास त्याला ते खेळ पाहण्याकरितां ती हळूच इशारा करते. पण असें न करितां; "नारु बाळा, असें करूं नये हो, असें केल्यानें मनीचें शेंपूट दुखावेल," असे चार सप्रेम शब्द बोलून, त्याचें मन त्या खेळापासून दूर करण्याचा ती काडीमात्र प्रयत्न करीत नाहीं. तशांत एखादे वेळेस मांजराच्या पोराला त्याचे ते खेळ न आवडून त्यानें त्यास आपल्या नखानें ओरबाडलें, तर मग काय विचारतां! त्या मांजराच्या पोरास ती आपल्या हातीं बरेच चपाटे देऊन नंतर नाऱ्याकडून आणखी आपल्यासमक्ष त्याचे खेळ कराविणारच.

यावरून स्पष्ट दिसतें कीं, दुसऱ्या प्राण्याला त्रास न देण्याविषयीं आईकडून मुलांना उपदेश मिळत नाहीं, एवढेंच नाहीं, तर तसें करण्याविषयीं उलट उत्तेजन मिळतें. तशांत, वर सांगितलेंच आहे कीं, आईवर मुलांचा पुरा विश्वास; यामुळें अशीं कृत्यें करण्याविषयीं त्यांच्या मनांत दिवसें दिवस ज्यास्त इच्छा उत्पन्न होते. आज

फक्त मांजराच्या पोरांना त्रास दिला; उद्यां शेजारच्या मुलाला मारणार; आणि परवां तिसऱ्याच प्रकारची एखादी खोडी करणार. याकरितां आईबापांनीं, व मुख्यत्वें करून आईनें, मुलांस चांगल्या मार्गास लावण्याची संधी आहे तोंपर्यंत तिचा चांगलाच उपयोग करावा.

## मुलीचें लग्न.

मुलाचें लग्न आणि मुलीचें लग्न यांमध्यें पुष्कळ फेर आहे. जेव्हां मुलाचें लग्न होतें, तेव्हां त्याचा आपल्या आईबापांशीं, इष्टमित्रांशीं, किंवा सोयऱ्याधायऱ्यांशीं, जो नात्याचा किंवा प्रीतीचा संबंध असतो, त्यामध्यें कांहीं व्यत्यय येत नाहीं. त्याचा तो सर्व स्नेह कायम राहून, आणखी नवीन सोयरेधायरे त्यास मिळतात, व नवीन स्नेहसंबंध उत्पन्न होतो. घरामध्यें सून माणूस आल्यानें मुलाचे आईस मोठा आनंद होतो, व व्यवस्थेनें राहिल्यास सर्वप्रकारें सुख होतें. मुलगा कोठें कामकाजानिमित्त बाहेर गेल्यास त्याच्या जाण्यापासूनही घर तितकें उदास दिसत नाहीं; कारण पुरुषजात ह्मटली ह्मणजे स्वतंत्र, मोकळी, आणि त्याचा घरापेक्षां बाहेर ओढा फार. यामुळें जरी तो बाहेर गेला, तरी गेलासा दिसत नाहीं. पण मुलीची गोष्ट वेगळी. ती नवऱ्याच्या घरीं जाते, त्या वेळीं आईबापांना जो तिचा वियोग होतो, तो खरा वियोग होय. जन्मापासून आजपर्यंत वाढविलेली जी आपली मुलगी, ती एक दोन घटकांच्या आंत आ-

घली नव्हे, परक्याची होणार; तिचा आपला इतके दिवसांचा संबंध कमी होऊन, अन्यत्र लोभ जडणार; हे विचार मनांत आले ह्मणजे, जरी तिच्या सर्व आप्तांना तिच्या लग्नसमारंभाचा मोठा आनंद झाला असतो, तरी त्यांच्या व मुख्यत्वें करून तिच्या आईच्या अंतःकरणांत भडभडून उदासपणाचा सुसकारा बाहेर फुटल्यावांचून कधींही राहत नाहीं. मुलगा झटला ह्मणजे जसा एकादा टवटवीत रोप वाढलेला असतो तसा स्वतंत्र असून हवा तिकडे काढून नेला तरी अडचण पडत नाहीं. मुलगी ही केवळ झाडाच्या आंगची खांदी; ही काढून नेतांच त्या झाडाला दुःख झाल्यावांचून राहत नाहीं. बाळपणापासून तुह्मी तिजवर मायाममता ठेवली, तिजवर जीव ठेवून आईबापांच्या खऱ्या प्रेमानें तुह्मी तिजसभोंवतीं नाचलां, तुमच्या प्रेमाची कधीं तृप्ति झाली नाहीं, आणि तिणेंही तुह्मां उभयतांचे उपकार मोठ्या प्रेमानें घडोघडी दर्शित केले. सगळ्या पृथ्वीपेक्षां तिजवर तुमची माया अधिक होती, आणि तीही तशीच तुह्मांला सर्वस्वीं परब्रह्म मानून राहत असे.

हें सगळें खरें; पण एकादे दिवशीं तुह्मीच एकादा कोणी मनुष्य बोलावून आणतां, त्याचा आदरसत्कार करतां, आणि तोच तुमच्या प्रीतीच्या घरट्यांतलें तुमचें लाडकें पाखरूं घेऊन कोठच्या कोठें पार होतो. सकाळीं उठून पाहतां घर उदास दिसतें; त्याचे शब्द ऐकण्याला तुह्मी कान लावून टपत बसतां; इकडे तिकडे पाहतां; पण तें कोठेंच दिसत नाहीं; तुमची लाडकी मैना उडून गेली;

तिचा पिंजरा मोकळा पडला; तिचा मनोहर किलबिलाट जाऊन जिकडे तिकडे थंडगार झालें. नित्याप्रमाणें लाडी-गोडीनें तुह्मांस जागृत करण्याला आज सकाळीं ती तुमच्या उशागतीं आपले सुवासिक पंख फडफडावीत आली नाहीं. पहावें तेथें उदास, सामसूम, भणभणीत. त्या लाडकेची खोली पहावी तों ती अस्ताव्यस्त; ती तरी पोरपणाच्या गडबडीमुळें अस्ताव्यस्त झालेली नव्हे, पण तिची आशाच सोडून निघून गेल्यामुळें. लग्नापूर्वीचे तिचे परकर, साड्या, चोळया, जिकडेतिकडे पसरल्या आहेत; पोरपणाच्या निरुपयोगी जिनसा लोळताहेत; खुर्च्यांवर, चौरंगांवर, खुंट्यांवर, कांहीं आडजूनीं सणगें पडलीं आहेत; पेट्या उघड्या; कपाटाचे खण अर्धुकडे उघडलेले; त्यांमधल्या जिनसा विसकटलेल्या; तिचा तो मोकळा पडलेला बिछाना; सत्रंजीवर विसकटून पडलेलीं मोठेपणीं न आवडणारीं तिचीं पोरपणचीं खेळणीं व बाहुल्या. हें सर्व पाहून, जशी एकादी चिमणी ससाण्यानें मारावी, आणि तिचे अस्ताव्यस्त पडलेले पंख दृष्टीस पडावे, तशी अवस्था होऊन, आईच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्यावांचून राहत नाहींत.

इतक्यानेंच झालें नाहीं; कारण, इतके दिवस जी त्या लाडकेची सर्व प्रीति आईवरच होती, ती आजपासून अर्धी झाली; आणि ज्या आईपणाच्या नात्यानें ही तिच्या-साठीं इतकी खंती करते, तें आईपण तिला एकदाचें प्राप्त झालें, ह्मणजे तर मग तिचा इकडचा लोभ फारच मंद पडणार. दोन चार महिन्यांमागें, किंबहुना आठ

पंधरा दिवसांमागेंही ज्या मनुष्याचें नांवहीं माहित नव्हतें, असा परका मनुष्य येऊन त्यानें तिची सर्व प्रीति ओढून घेतली; आणि लहानपणापासून मोठ्या काळजीनें, श्रमानें आणि हरएक सुखाच्या रीतीनें तिचें लालनपालन केलें तें सर्व मागें पडलें. तें असो, पण तिचें लेकुरपणचें चुंबन तेंही त्या परक्या मनुष्यानें आपणास मिळेनासें केलें. फक्त वडीलपणाचा मान मात्र काय तो आपला राहिला, बाकी सर्व निघून गेलें. त्या मुलीचे सर्व मनोविकार आतां नवऱ्याकडे गुंतले. नवरा जर तिच्या मनाजोगता मिळाला, तर मोठ्या आनंदानें आपला सर्व संसार चालवून ती अखंड त्याच्या बऱ्यावाईटाचा वांटा घेते. नवरा न आवडला तरी मन घट्ट करून आपला संसार चालविलाच पाहिजे. सृष्टिनियमाप्रमाणें व धर्मशास्त्राप्रमाणें, तिणें नवऱ्याच्या सुखदुःखाचा वांटा घेतलाच पाहिजे. ह्मणून त्यापासून सुख किंवा दुःख मानणें हें प्रत्येकीनें आपल्या विचारानें ठरविणें अवश्य आहे. असो. कोणत्याही प्रकारें तिणें नवऱ्याचा चांगला संसार केला, तरी आईला जो तिचा वियोग झाला त्यामध्यें कांहीं फेर पडत नाहीं.

तथापि इतके दिवस मुलीची आपणावर जी प्रीति होती ती कमी होत जाऊन नवऱ्यावर अधिकाधिक वाढत चालली, याबद्दल मुलीला दोष देणें बरोबर नाहीं. कारण लहानपणासून तिच्या मनामध्यें नवऱ्यावर प्रीति ठेवावी असे विचार आईनेंच भरून दिलेले आहेत; स्वतः ती आई आपल्या आईचें घर सोडून नवऱ्याचा संसार

दक्षतेनें चालवीत आहे असें ती पाहते; आणि धर्मशास्त्रामध्येंही याप्रमाणें न वागल्यास अपराध घडतो असेंच सांगितलें आहे. याकरितां आपली गेलेली जी कन्या, तिची सर्व प्रीति पुनः आपल्यावर जडावी अशी वेडगळ इच्छा न धरतां, 'परमेश्वरा, दिवसेंदिवस त्या उभयतांमधील प्रीति वाढून त्यांच्या सुखाची वृद्धि होवो, आणि त्यांचें कौतुक असेंच आमच्या दृष्टीस पडो,' असेंच मनापासून चिंतीत जावें.

---

## माता आणि बालक.

बरें, आपण एका लेंकुरवाळ्या गृहास्थिणीचें चित्र लक्षांत आणूं. तिणें आपल्या पोटाशीं धरलेल्या लहानशा गोजिरवाण्या बालकाच्या देहामध्यें काय बरें असावें! तर या सृष्टीमध्यें ईश्वराच्या करणीचें जें अतिशय पराक्रमी यंत्र, ह्मणजे मनुष्याच्या मनाचें बीज, तें त्यामध्यें भरलें आहे. तरी तें बरें किंवा वाईट यांतून हव्या त्या मार्गाकडे लावतां येण्याजोगें आहे. त्याच्यामध्यें अनेक तर्क, अनेक विचार, अनेक कल्पना, गूढ रूपानें राहिल्या आहेत; तरी सध्यां त्याचें त्यालाच ज्ञान नाहीं. सांप्रत तें अज्ञानाच्या अंधारामध्यें लोळत आहे. तथापि त्या अंधाराच्या मधून मधून ज्ञान, प्रीति, आणि सत्य यांच्या प्रकाशाच्या झुळका प्रतिक्षणीं चकाकत आहेत. अशा या झुळकांचा मूळ उगम पाहिला असतां, मातेच्या अंतःकरणांतील प्रीति, आणि तिचें सप्रेम दृष्टीनें त्याकडे डोळाभर पाहणें हा हाय. प्रकाश, वायु, उष्णता, उदक, इत्यादिकांचा जसा सृष्टींतील

वनस्पत्यादिकांवर परिणाम घडतो, तसाच मातेच्या मनाचा मुलावर परिणाम घडतो. तिचें हास्यवदन, तिचें उत्तेजनयुक्त भाषण, तिचें प्रेमळ चुंबन, तिचें मायाळू दटावणें, तिचा शांत राग, यांचा त्या बालकाच्या मनावर जो परिणाम घडतो, तो कसा? तर एखाद्या नाजूक रोप्याला जसें आकाशांतील नाजूक दंव, जसा ताजेपणा देणारा पाऊस, जसा बाह्यतः कडक दिसणारा वायु, आणि जसें आनंददायक सूर्यकिरण, तसा होय. लक्ष देऊन पहा कीं, कोट्यावधि लोकांच्या घडामोडी करून ज्याणें त्यांवर अंमल चालविला असेल, जो सर्व मनुष्यांमध्यें अतिशयित प्रज्वलित बुद्धीचा ज्ञानी होऊन गेला असेल, तोही अशा या क्षुद्र क्षणभंगुर अशक्त बालदेहामध्यें प्रथमतः विराजमान झाला होता. तशीच ही दुसरी एक गोष्ट दुःखकारक खरी, पण खोटी ह्मणतां येत नाहीं. ती अशी कीं, जो केवळ कर्मचांडाळ, ज्याणें जन्मास येऊन मनुष्यदेहास केवळ डाग लावला, जो सर्वस्वी मनुष्यपणांतून उठला, सर्वांशीं भ्रष्ट,—सर्व जगाला मुकलेला, असा जो कोणी असेल, तोही बाळपणीं मातेच्या मांडीवर निष्कळंकरूपानें पोसला गेला होता; आणि त्याचें अंतःकरण त्या वेळीं शुद्ध चैतन्यासारखें निर्मळ होतें.

अहाहा! आपण सन्मार्गानें वागून मोठेपणीं चांगल्या स्थितीला पोंचल्यावर, आपल्या बाल्यदशेंतील आनंदमय गोष्टी मनांत आणणें हें किती बरें आल्हादकारक कृत्य आहे! अंतःकरण आंतून आनंदानें भरून आल्यामुळें अवर्णनीय प्रेमळ दृष्टीनें त्या मातेनें आपणाकडे पहावें;

कोमळ प्रीतीनें गोंजारून पित्यानें आपले लाड चालवावे; जसजसे त्या उभयतांच्या श्रमानें आणि उपदेशानें आपण वाढत चाललों, आणि आपणास समजूत येत चालली, तसतसा त्यांचा आनंद कसकसा वर्धमान होत जावा; शास्त्रांतील वाक्यें त्यांच्या मुखांतून आपण कसकशीं ऐकून पाठ करावीं; आणि आपल्या स्मरणामध्यें त्यांणीं परमेश्वराचें सत्य कसें बिंबवून द्यावें! या सर्व गोष्टींची आठवण केली असतां, तसेंच जें जें या संसारामध्यें आपणांस सुख ह्मणून होत आहे, तें तें सर्व मुख्यत्वें त्यांच्या ममतेपासून, हें मनांत आणलें असतां, किती बरें आपल्यास आल्हाद होतो!

मुलांना शिक्षण देण्याला मातेसारखा दुसरा शिक्षक नाहीं. आईबापें आणि बालक यांच्या परस्पर संबंधावर, मृत्यूनें, भांडणानें, किंवा अन्य कांहीं गोष्टींनीं जेथें क्रूरपणें अकाळीं घाला घातला, तेथली स्थिति दुःखकारक, आणि तेथला भावी परिणामही शोकार्हच! तिच्या लाडक्या बाळाच्या तोंडावरील बाळशाचें तेज उतरल्यापूर्वींच जर तिला भगवंतानें अकाळीं बोलावणें केलें, तर त्या बिचाऱ्याची अवस्था खरोखरी हृदयभेदक होते, व प्रसंगीं मोठ्या धोक्यांतही पडते. पण तशांत आईबापांचे दोष, त्यांचे दुर्गुण, त्यांचा अविचारी कठोरपणा, आणि त्यांचें जाणूनबुजून दुर्लक्ष, यांमुळें जर बालकांची मति भ्रष्ट झाली असली, आणि अंतःकरण दुरावलें असलें, तर त्या शोकार्ह स्थितीचा कळसच झाला यांत संशय नाहीं.

## सुसंवाद १.

जेवणखाण झाल्यावर, सरस्वतीबाई आपल्या दिवाणखान्यांत बसली आहे, इतक्यांत तिची शेजारीण गोपिकाबाई तेथें आली. कांहीं वेळ इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर गोपिकाबाई ह्मणाली, " कां हो सरस्वतीबाई, कांहीं गडबड फारशी दिसते; लाडवांचें संधान आहे वाटतें कांहीं? "

**सरस्व०**—हो! आतां आमच्या विनायकाची मुंज आहे—लग्न आहे, गोदेचेंही लग्न आहे, त्याची गडबड.

**गोपिका०**—विनायकाची मुंज आणि लग्न एकदाच का? त्याला आतां कितवें पांचवें कीं साहवें वर्ष. अजून त्याच्या मुंजीचीही पुर्ती वेळ आली नाहीं. आणि लग्न सुद्धां एकदमच करायचें?

**सरस्व०**—हें हो काय विचारतां? आतां काय तो मुंजीला लहान झाला?

**गोपिका०**—मुंजीचें एक असो! पण इतक्यांतच का हो बाई त्याचे लग्नाचेही दिवस आले?

**सरस्व०**—तर काय भिकाऱ्याच्या पोरासारखा बारा बारा, पंधरा पंधरा, वीस-तीस वर्षांपर्यंत पोर वाढवायाचा? इश्श मेलें! देवानें चार पैसे दिल्याचें सार्थक तरी काय झालें? चार दिवस डोळ्यांचें सुख घ्यावें, अंमळ मिरवावें, ह्मणून देवापाशीं पोरें मागतात. नवरा नवरी लहान पाहिलीं ह्मणजे मनाला समाधान वाटतें; नाहीं तर आपले वाढले घोडेश्वर! कोणी ह्मणावें कीं आईबा-

पांपाशीं पैसा नाहीं, ह्मणून हे एवढे वाढले! आपल्याला नाहीं बाई तसलें शोभत. आपल्या अबरूप्रमाणें हवेतर चार पैसे अधिक खर्चून मनाची हौस पुरवावी. आमच्या विनायकाची मुंज पुढच्या वर्षीं करावी, असा बेत चालला होता; पण मी हट्ट धरून बसलें आणि ह्मटलें कीं "तें नाहीं चालावयाचें. मी त्याचें यंदा लग्न करणार; तुह्मांला हवी तर मुंज करा, नाहींतर नका करूं. ती भिकारडी यमुनाबाई, तिणें आपल्या मुलाचें लग्न पांचव्या वर्षीं केलें, आणि आमच्या सारख्यांचा पोर अजून लग्नावांचून फिरावा, ही लाज नाहीं का वाटत?" त्यांनीं आढेवेढे पुष्कळ घेतले. पण मी हें वर्ष कोठें जाऊं देणार आहें?

**गोपिका०**—पण तुमचे यजमान काय ह्मणतात?

**सरस्व०**—ते हवें तें ह्मणेनात, मी नाहीं ऐकायाची. कुठचा मुलगाच लहान, कोठचें कांहींच, कोठचें कांहींच. पण तुह्मीच पहा गोपिकाबाई, लहानपणीं लग्न शोभेल तसें मोठेपणीं शोभेल का? आणखी मी तुह्मांला सांगतें, कोठें बोलूं नका हो, तुह्मांला माझ्या गळ्याची शपथ आहे, त्यांचें ह्मणणें कीं, मुलगा लहान, आणखी तशांत तूर्त हातीं पैसा नाहीं. पण तुह्मीच पहा कीं, हातीं पैसा नसला ह्मणून कांहीं आजचा दिवस उद्यांला येतो? पांच चार हजार रुपये कर्ज झालें, तर मेलें त्याचें काय मोठेंसें? पण पोर वाढली याची लोकांमध्यें कांहीं लज्जा वाटेल तिकडे पाहिलें पाहिजे कीं नाहीं? कर्ज काय मेलें हांहां ह्मणतां फिटून जाईल, पण एकदां लोकांनीं नांव ठेविलें ह्मणजे तेथें कांहीं उपाय चालेल का?

**गोपिका०**—होय बाई, नव्या नव्या काय काय चाली निघतील त्या खऱ्या. आमच्या वेळीं वीस वीस पंचवीस वर्षांचा मुलगा झाल्यावांचून लग्नाचें ह्मणून नांव निघायाचें नाहीं. पण आतां जुनें डोळे आणि नवे तमासे पहावे!

**सरस्व०**—अहो ज्या वेळचें त्या वेळीं! त्या वेळीं पैसा मिळत होता कोठें? चाळीस रुपडे किंवा पन्नास रुपडे झाले ह्मणजे मोठा कामदार झाला! आतां पांचशें आणि हजार कोणाच्या खिसगणतींत आहेत? तुमच्या वेळीं अशा फैटणी आणि रथ पाहिले होतेत का कधीं?

**गोपिका०**—तुह्मांला बाई राग येणार नाहीं तर मी बोलतें. आमच्या वेळीं पगार थोडा जरी असला, तरी त्यांतच चार पैसे राखून आह्मी संसार केला. पण—

**सरस्व०**—बोला बोला, अडखळूं नका, मला राग नाहीं यायचा.

**गोपिका०**—पण मी ह्मणतें, हजारों रुपये मिळून पण शेवटीं मारवाड्या—तसें नव्हे हो, पण तितकाही पैसा पुरत नाहीं ह्मणतें.

**सरस्व०**—पण तेव्हांसारखें भिकारपण काढलें तर आतांही पुष्कळ पैसा शिल्लक राहील. पण त्याला घेऊन काय करायचें?

**गोपिका०**—तेव्हां ह्मणजे भिकारपणानें लोक राहत होते असें तुह्मीं समजूं नका हो. तेव्हांही पुष्कळ श्रीमंत लोक होते, पण बाई त्यांना आह्मी श्रीमंत, आह्मी श्रीमंत, असा गर्व मात्र नव्हता.

**सरस्व०**—पण भोगायाला जर श्रीमंती नाहीं, आणि पोरें वाढलीं पंधरा पंधरा वीस वीस वर्षांचीं, तर ती श्रीमंती घेऊन काय करायाची?

**गोपिका०**—मुलांचीं लग्नें लवकर केलीं ह्मणजे श्रीमंतीचें सार्थक झालें असें नाहीं. तोच जर पैसा त्यांच्या कांहीं कल्याणाच्या कामीं लावला, त्यांच्या विद्याभ्यासांत खर्चला, त्यास कांहीं धंदारोजगार लावून दिला, तर त्यापासून पुढें आपलेंच कल्याण आहे.

**सरस्व०**—काम, धंदा, विद्या, आणि रोजगार, अहो, ज्यांच्या त्यांच्या प्रारब्धाच्या गोष्टी. आईबापांनीं पुरवून पुरवून किती पुरवायाचें आहे? चांगलीशी पोर पाहून त्याच्या गळ्यांत एकदांची बांधून टाकली ह्मणजे त्याच्या ऋणांतून आपण मुक्त झालों.

**गोपिका०**—तुह्मी रागावणार नाहीं ह्मटलेंत, ह्मणून मी बोलतें हो. एवढ्याशा मुलाचें लग्न करण्याला कारण काय तें लोकांनीं श्रीमंत ह्मणावें, आणि लहान नवरा शोभतो बरा, एवढेंचना? कीं आणखी दुसरें कांहीं आहे?

**सरस्व०**—लहान नवरा शोभतो हें तर खरेंच. पण "श्रीमंत ह्मणावें ह्मणून," असा जो तुह्मी ठोमणा मारलात त्यांत अधिक तें काय केलेंत? श्रीमंतांना कोणीही श्रीमंत ह्मणेल; आणि श्रीमंतांप्रमाणें श्रीमंतांनीं वागलेंच पाहिजे.

**गोपिका०**—अहो बाई, मीं ठोमणा मारला असें तुह्मी समजूं नका. परमेश्वराच्या कृपेनें तुमच्या घरीं अखंड लक्ष्मी नांदो. पण त्या मुलाचें वय तरी होऊं द्या.

**सरस्व०**—वय होऊं द्या ह्मणजे? त्याला कांहीं मोठी मुलगी आणली नाहीं. तिलाही नुकतें चवथें वर्ष लागलें आहे. जोडा बरोबर आहे. इतकें कांहीं आह्मांला समजत नाहीं असें नाहीं.

**गोपिका०**—तुह्मांला वाटतें खरें, पण बायकोची जात गर्रकन वाढते, हें तुह्मांला नाहींका ठाऊक? धर्मशास्त्रांत सांगितलें आहे कीं, नवऱ्यापेक्षां नवरी आठ दहा वर्षांनीं तरी लहान असावी. आणखी लग्नाची गोष्ट ह्मटली ह्मणजे तें वेळच्या वेळींच झालें पाहिजे.

**सरस्व०**—हें वेळच्या वेळींच आहे.

**गोपिका०**—तसें नव्हे. लग्न ह्मटलें ह्मणजे या जन्माच्या गांठी आहेत. त्यांत आणखी दुखणें बाहणें आहे, ( ईश्वराच्या दयेनें तुमचीं मुलें चिरंजीव असोत ). या करितां आपलीं मुलें देवाच्या दयेनें धडधाकड होत तोंपर्यंत त्यांच्या लग्नाची गोष्टही बोलूं नये, असा आमच्या घरीं नेहमीं कोणी आल्या गेल्यास उपदेश होत असतो. त्यांत लग्न ह्मटलें ह्मणजे आपणावर केवढें ओझें पडलें, हें त्या वधूवरांना नीट समजलें पाहिजे. त्यांना संसाराचा गाडा पुढें लोटण्याचें सामर्थ्य आलें पाहिजे. एकमेकांच्या मर्जीनें राहून शहाणपणानें आणि प्रीतीनें कसें वागावें हें त्यांना समजलें पाहिजे, आणि त्यांच्या विचारानेंच लग्न झालें पाहिजे. नाहींतर लग्न करते वेळीं आईबापांस मौज वाटते खरी, पण शेवटीं नानातऱ्हेचीं विघ्नें त्यापासून उत्पन्न होतात. कोठें कांहीं. कोठें कांहीं. असे हजार प्रकार उत्पन्न होतात. आतां केवळ आली-

कडच्या इंग्रजीमताप्रमाणें जिचा तिणें नवरा आणि ज्याची त्याणें बायको शोधून काढून लग्न करावें, असें मी ह्मणणार नाहीं. माझ्या मतें तर तें अगदीं वेडेपण आहे. त्यांचीं चाल त्यांना बरी वाटत असेल. पण केवळ्या जरी पोरी मोठ्या झाल्या, तरी त्यांना ह्मणजे आवडनिवड करण्याचें वास्तविक ज्ञान येईल असें होणार नाहीं. याकरितां मुलगा किंवा मुलगी समजुतींत आल्यावर, आई बापांनीं आणि नातलगांनीं त्यांच्या खऱ्या कल्याणाकडे दृष्टि देऊन, पुष्कळ शोध करून, त्यांच्या संमतीनें त्यांचा योग्य जोडा जमवून द्यावा, हेंच योग्य आहे.

**सरस्व०**—असें सर्व चांगलें पाहून लग्न केलें असतां तेथें नाहीं का अडचणी उत्पन्न होत?

**गोपिका०**—एखादे वेळीं मनुष्य रस्त्यानें जपून चालत असतांनाही ठेंच लागून पडतें, ह्मणून नेहमी डोळे झांकून चालावें असें झालें?

**सरस्व०**—होय बाई, तुह्मी ह्मणतां तें खरें वाटतें. पण आतां लग्नाचा बेत राहिला, तर लोकांमध्यें हंसे नाहीं का होणार?

**गोपिका०**—खऱ्या गोष्टीला लोक जरी हंसले तरी आपण आपलें हित पाहिलें पाहिजे.

**सरस्व०**—बरें तर बाई तसेंच करतें.

**गोपिका०**—बरें बाई, माझें सांगणें तुह्मी ऐकलेंत ह्मणून मला बरें वाटलें. आतां उशीर झाला, मी येतें.

**सरस्व०**—गोपिकाताई, तुह्मी वडील माणसें ह्मणून ही खरी गोष्ट मला सांगितलीत. तुमचे बाई मोठे उप॰

कार झाले. तुह्मांपाशीं पुष्कळ बोलायाचें होतें, पण आतां तर उशीर झाला. उद्यां मात्र खचीत या हो. का मीच तुमच्या घरीं येऊं?

गोपिका०—होय बाई, तुह्मां श्रीमंतांचे पाय आमच्या घरीं कशाला लागतील? मीच येतें.

सरस्व०—बरें तर.

---

## सुसंवाद २.

सरस्वतीबाई कांहीं कामांत गुंतली आहे, आणि आपण समोर उभी असतां आपणाकडे तिचें लक्ष नाहीं, असें पाहून तिला गोपिकाबाई ह्मणते—कां सरस्वतीबाई, आज गरीबावर इतका रागसा?

सर०—कोण, गोपिकाबाई का? मी बाई पाहिलेंच नाहीं. अंमळ या कामाच्या खटपटींत होतें, तेव्हां तुह्मांकडे लक्ष लागलें नाहीं. राग करूं नका. या बसा.

गोपिका०—होय बाई. आतांच इतकें, तर पुढें बाळाच्या लग्नाचे लाडू डोळ्यावर आले ह्मणजे कसें काय होईल तें पहायाचें आहे.

सर०—बाळाच्या लग्नामध्यें तर तुह्मी आडफांटा आणलाच, तेव्हां तें इतक्यांतच कसचें होतें? पण काय हो, त्या आपल्या गोविंदरावाच्या मुलाला तुह्मी पाहिलें आहेना?

गोपि०—हो, पाहिलें आहे. पण कां बरें?

सर०—आमच्या सुंदराबाईला तो नवरा शोभेल कीं नाहीं?

**गोपि०**—तुमच्या सुंदराबाईला?

**सर०**—असें हो काय बाई तुह्मी जेव्हांतेव्हां विचारतां? तुमच्या 'सुंदराबाईला' ह्मणजे काय?

**गोपि०**—तसें नाहीं हो. पण अजून ती लहान दिसते, ह्मणून ह्मटलें.

**सर०**—लहान कशाची? कालच्या दिवाळीला तिला पांचवें वर्ष लागलें.

**गोपि०**—पांचवें वर्ष! तेव्हां फारच मोठी खरी!

**सर०**—तुह्मी मागें ह्मणालां, कीं नवऱ्यापेक्षां नवरी पांच सात वर्षांनीं तरी लहान असावी ह्मणून. त्यामुळें बाळाचें लग्न राहिलें. पण आतां गोविंदरावाच्या मुलापेक्षां आमची सुंदरी पांच वर्षांनीं तरी लहान नाहींका होणार? तेव्हां आतां अडचण ती कोणची?

**गोपि०**—नवरानवरीमध्यें पांच वर्षांचें अंतर असलें, ह्मणजे दुसऱ्या गोष्टी सगळ्या आल्या वाटतें त्यामध्यें? तुह्मी थोर माणसें, तेव्हां हवें तें कराना; पण आपल्याला नाहीं बाई हें योग्य वाटत. लग्न ह्मणजे काय, नवरा ह्मणजे काय, हें तरी तिला समजतें आहे का अजून? जशी तिची खेळायाची बाहुली, तसाच तिला नवरा.

**सर०**—हो, अजून पोरपणच आहे ना, तेव्हां तिला समजूत ती कसली असणार?

**गोपि०**—ह्मणूनच मी ह्मणतें, पोरपणीं लग्न करूं नये ह्मणून. तिला मोठी होऊं द्या; चांगलें वाईट समजूं लागूं द्या; नवऱ्याशीं वागावें कसें, घरच्या माणसांशीं वागावें

कसें, हें तिला कळूं लागूं द्या. उगीच वेड्या वेड्या चाली करूं नका.

सर०—समजायाच्या वेळीं सगळें समजेल. पण लहानपणच्या लग्नाची शोभा पुढें येते का गोपिकाबाई?

गोपि०—एकून शोभेसाठीं, बाहुल्यांच्या लग्नासारखें मुलीचें लग्न करावें, आणि मागची पुढची कांहींच चिंता करूं नये आणि आपल्याच मजेकडे लक्ष द्यावें, होय ना?

सर०—असें कसें बरें ह्मणतां? आपल्या पोटची पोर, तिची काळजी नाहीं असें कोठें होईल का? देवानें आपणाला दिलें आहे त्यांतून दहापांच हजारांचे तिला दागिने केले, आणि तिचा बंदोबस्त ठेवला, ह्मणजे झालें.

गोपि०—पैसा तर या काळांत मोठा आहे खरा; पण सरस्वतीबाई तुह्मी रागावूं नका, मी कांहीं दुष्टपणानें बोलतें असें तुह्मी नका समजूं. लक्ष्मी अशाश्वत आहे, आईबाप देऊन किती बरें देणार आहेत? द्यावें परमेश्वरानें. हाच पहा तुमच्या समोर चिंतोपंत होता, त्याणें मुलांना का थोडी दौलत ठेविली होती? पण आतां कांहीं राहिलें आहे का? अन्नाची मुद्दां ददात; खरें कीं खोटें तुह्मीच पहा.

सर०—पण त्यांणीं आपल्या गुणांनीं तशी अवस्था करून घेतली. त्याला दुसऱ्यांनीं काय बरें करावें?

गोपि०—मीहि तेंच ह्मणतें. पोरपणीं मनुष्यांचा स्वभाव समजत नाहीं, यासाठीं कोणी आपल्या वयांत येऊन कामकाजाला लागे तोंपर्यंत, आणि त्याचे बरेवाईट गुण समजत तोंपर्यंत, तो कसा निपजेल हें आधीं सांगवत नाहीं. यासाठीं नुसत्या पैशाकडे पाहून होतें असें नाहीं. तो रो-

गी निरोगी हें पाहिलें पाहिजे. तसेंच जसा मुलाचा स्वभाव लहानपणीं समजत नाहीं, त्याप्रमाणेंच मुलीचाही स्वभाव समजत नाहीं. त्या दोघांच्या मनांचा अजमास घेतल्यावांचून लग्न करणें हेंही नीट नाहीं. अकरा बारांचा सुमार झाल्यापूर्वी तिला कांहींच समजत नसतें. मुलीला आधीं सासूच्या घरीं कोणत्या रीतीनें वागावें, सर्वांची मर्यादा कशी ठेवावी, सभ्यपणा कसा ठेवावा, स्वच्छपणा कसा ठेवावा, सद्गुणानें कसें राहावें, संसार कसा करावा, कामकाज कसें करावें, हें सर्व शिकविलें पाहिजे. नाहींतर मग सासूसुनेचे कज्जे, नणंदाभावजयांचे कज्जे, जावाजावांचे कज्जे, एकमेकींचा द्वेष, नवऱ्याबायकोचें भांडण, असल्या गोष्टी होऊं लागतात; कोठें कोठें बायकोला वाटतें, आपला नवरा आणि आपण या दोघांनींच आनंदानें राहावें, सासूसासरा आणि घरचीं दुसरीं माणसें यांच्याशीं आपला कांहीं संबंध नाहीं; त्यांच्या कल्याणाच्या गोष्टी करण्याची आपणांला गरज नाहीं. पण हें वेडेपण आहे. सर्व लोकांनीं आनंदानें आणि एक मतानें राहिल्यानें सर्वांचें कल्याण आहे. पण सर्व गोष्टी आईबापांनीं शिकविल्या तर त्यांना समजणार, नाहीं तर काय?

**गोपिका०**—तुह्मी ह्मणतां तें कांहीं खोटें नाहीं. पण यांतल्या पुष्कळ गोष्टी लग्न झाल्यावर सुद्धां शिकवितां येतील. लग्नाचा आणि या गोष्टींचा काय संबंध?

**सर०**—पण लहानपणापासूनच जर चांगली शिक्षा नसली, तर पुरुष काय आणि बायको काय, त्यांना वाटूं लागतें कीं, आपलें लग्न होऊन गेलें, आतां आपण

पाहिजे त्या रीतीनें जरी वागलों, तरी झालेलें लग्न कांहीं फिरत नाहीं. असे वेडे वेडे विचार त्यांच्या मनांत शिरतात, आणि आईबापांच्या सांगणीकडे त्यांचें लक्ष लागत नाहीं. हें एक; आणखी स्वभाव कांहीं सर्वस्वीं शिकवूनच येत नाहीं. याकरितां त्यांचा स्वभाव समजे तों घाई करणें नीट नाहीं. दुसरें एक आहे. ईश्वरानें कोणावर तशी वक्रदृष्टि करूं नये, पण मुलांना पडसें आहे, खोकला आहे, नानातऱ्हांचीं दुखणीं आहेत, कोणती वेळ कशी येईल हें कोणाला समजत नाहीं. यासाठीं पोरीचें अकरा बारा वर्षांचें वय होई तोंपर्यंत तरी तिच्या जन्माच्या गांठी घालूं नयेत. प्रारब्ध हें भगवंताच्या हातीं खरेंच; पण आपण होऊन जितकें तिचें बरें होईल तितकें करावें.

**गोपिका**०—बरें तर बाई, तुमच्या ह्मणण्याप्रमाणेंच करितें. तुह्मी तर माझें मन अगदींच बदलून टाकिलें.

---

## 'बायको भली तर नवरा भला.'

एके दिवशीं **नर्मदाबाई**, आपली सोबतीण **सरस्वतीबाई** शेजारीं राहत होती, तिच्या घरीं रिकामपणीं बसायाला गेली होती. त्या दिवशीं नर्मदाबाई फारच रागावलेली होती, आणि तिकडे जाऊन बसली न बसली इतक्यांत ह्मणाली, "होय तर! तुला बोलायला काय? सगळें सोपें

वाटतें. तुला एक बिचारा तो भोळसट नवरा मिळाला आहे, तेव्हां, आह्मांला एका सकाळपासून मध्यरात्रपर्यंत एकसारखी टोचणी ऐकून ऐकून कसें काय होतें, हें तुला कशानें समजणार?"

**सरस्वतीबाई**—हें खरें बाई, आमच्या घरच्यांची फिर्याद सांगायाला मला कांहीं कारण पडत नाहीं. पण मला एक वाटतें, बहुशः बायको भली तर नवरा भला, ही गोष्ट खरी आहे.

**नर्मदा**—काय बोलतेस ग तूं हें? आमच्या घरच्यांसारखें एकादें जनावर तुझ्या गळीं पडलें असतें, ह्मणजे मी पाहिलें असतें, तूं कसें काय करतीस तें.

**सरस्वती**—(अमळ हसून) असें कां बरें ह्मणतेस? मी तर पहिल्यानें ती गोष्ट कोणाला कळूं नये ह्मणून मोठा बंदोबस्त ठेवला असता.

**नर्मदा**—हीच बाई तुझी खोड! याचाच मला राग येतो तो! जेव्हां तेव्हां तूं आपली त्यांची बाजू घेऊन भांडतेस. तुजकडे एकाद्या गोष्टीची फिर्याद सुद्धां सांगायला कोणी येऊं नये.

तिचें भाषण न ऐकतां सरस्वती ह्मणाली—माझी आई मोठी शाहणी होती बाई. तिनेंच मला चार रीतीच्या गोष्टी शिकविल्या. ती वरचेवर ह्मणे, 'पोरी, नीट ध्यानांत ठेव. लग्न झालें ह्मणजे पुष्कळ सोशिकपणा धरला पाहिजे. लग्न ह्मणजे कांहीं गुळखोबरें खायाची गोष्ट समजूं नको; तेथें पुष्कळ सोशिकपणा धरला पाहिजे. आणखी एक गोष्ट लक्षांत ठेव, ह्मणजे तुझा संसार सो-

न्याचा होईल. कधीं तुझ्या घरामध्यें तुमची तुमची कांहीं कटकट जर झाली, तर कधीं बाहेर बोलूं नको. बाहेर बोललें ह्मणजे तितकी मनासमोर ती गोष्ट अधिक दिसूं लागते; आणि कदाचित् जरी तुला विसर पडला, तरी तुझ्या सोबतिणींला विसर पडणार नाहीं; आणि एकादे दिवशीं ज्या वेळीं तुझ्या लक्षांत सुद्धां ती गोष्ट नसेल, त्या वेळीं तें तुझें वर्म काढून त्याच तुला हंसतील, हें लक्षांत ठेव.'

**नर्मदा**—तुझी आई शाहणी नसेल ह्मणत नाहीं मी. पण यांत कसलें मोठें शाहणपण झालें? आपल्या जिवाला जें दुःख झालें असेल तें झट् कीं फट् एकदम बोलून टाकावें ह्मणजे कटकट गेली. माझें तर ह्मणणें असें आहे.

**सरस्वती**—तें खरें, पण तशानें कटकट जाते कशी? ती तर वाढतच जायाची. तूं ती लोकांला कळवायाच्या आधीं लहानशीच असते, ह्मणून काय झालें? एकदा बाहेर फुटल्या बरोबर ती फार मोठी होते. मी आतां तुला विचारतें ह्मणून समज, आणि मला सांग, जर एकादी वाईट गोष्ट घडली, आणि तुझ्या मनांत असलें कीं, त्या गोष्टीची तुला वरचेवर आठवण पडूं नये, तर तूं काय बरें युक्ति करशील? तीच गोष्ट पुनः पुनः मनांत आणून, हिला सांग, तिला सांग, हिच्यापाशीं बोल, तिच्यापाशीं बोल, असें करून त्या गोष्टीचा कधींच विसर पडूं नये असें करशील?—कीं, आपली झटपट उठून कामाला लागशील, नाहींतर घरामध्यें झाडलोट करून जेवणाखाण्याच्या खटपटीकडे लक्ष लावशील, आणि ती

गोष्ट कामाच्या नादामुळें बिसरून जाईल असें करशील? खरें सांग.

नर्मदेला तिच्या भाषणाचा भावार्थ जितका स्पष्ट समजायाचा तितका समजला, तरी ती ह्मणाली, "मी जी तुला गोष्ट सांगितली, तिचा आणि या गोष्टीचा संबंध काय?"

**सरस्वती**—संबंध इतकाच कीं, तुझी आणि तुझ्या नवऱ्याची जर कांहीं कटकट झाली, तर दुसरी एकादी वाईट गोष्ट जशी तूं विसरून घालविशील, तशीच हीही घालीव म्हणजे झालें, इतकाच संबंध.

नर्मदा तिरस्कारानें आपल्या मस्तकाला एक झटका देऊन ह्मणाली—"होय, सगळ्या गोष्टी सांगायला सोप्या आहेत. दुसरें मनुष्य जितका सोशिकपणा धरील तितका मी धरीन, पण इतक्या गोष्टी कशासाठीं? मी नाहीं सोशिकपणा धरायाची; आणि दुसऱ्यांनीं तरी कशासाठीं मला सोशिकपणा धरायाला सांगावें?"

"दया क्षमा शांती ॥ तेथें देवाची वसती" असें सरस्वतीनें मोठ्या शांततेनें ह्मटलें.

नर्मदा रागाच्या झटक्यानें ह्मणाली—बरें, मी सोशीकपणा धरीन म्हटलें, आतां काय?

**सरस्वती**—पण असें पहा, आपल्या हातून एकाद्याचा कांहीं अपराध घडला, आणि त्यानें आपणाला सांगितलें कीं, असो मी क्षमा केली; आणि असें सांगून पुनः जर त्यानें आमचा अपराध घडोघडी उकरून काढून त्याची घासाघीस चालविली, तर त्यानें खरी क्षमा केली असें आपणांला वाटेल काय? आमच्या मनाला

त्या गोष्टीची खंत झाली असून, आणखी पुनः पुनः वांचणी आपण सोसून घेऊं काय?

नर्मदा–तूं तरी भलत्याचें भलतें भाषण करतेस, हें कांहीं तुला शोभत नाहीं. तूं ह्मणतेस तसली वेडगळ क्षमा घेऊन काय करायची?

**सरस्वती**–तें खरें; पण आह्मी तुह्मी क्षमा करतों ती क्षमा असल्याच तऱ्हेची असते.

**नर्मदा**–असें जर सगळेंच आमचें म्हटलेलें अगदीं बिनचूक चालेल, तर मग आम्ही मोठ्या अवतारी बाय-काच होऊं.

**सरस्वती**–तसें कांहीं नाहीं, केलें तर सर्व होण्या-जोगें आहे. सोशीकपणा धरला पाहिजे, ही मुख्य गोष्ट.

**नर्मदा**–[अंमळ थंडपणानें] काय बाई, आमच्या वरच्यांचा स्वभाव सांगूं तुला, पायांची तिडीक कपाळास चढते!

**सरस्वती**–असेल खरा. म्हणून काय झालें? विस्तव जर विझवायाचा असला, तर तूं काय त्यामध्यें नव्या काटक्या घालून फुंक मारून तो अधिक पेटविशील कीं एकदम चुलींतून निखारे बाहेर काढून ते थंड करशील?

**नर्मदा**–यांत काय सांगायाचें? हें उघडच आहे.

**सरस्वती**–तर मग ही गोष्ट तुला कशी ठाऊक नाहीं, कीं आपली जीभ ही एक प्रत्यक्ष आगच आहे, आणि ती सगळ्या जगाला आग लावील? यासाठीं जर आ-म्हांला ही आग पेटूं द्यायाची नसली, तर चुलींतली

आग जशी आपण विझवितों, तशीच ही. विझविली पाहिजे. आपणांला जर कांहीं दुःख झालें असलें, तर तें पुनः पुनः मनांत आणून वाढवूं नये. तसें केलें म्हणजे आगींत तेल ओतल्याप्रमाणें होतें. अमका तमका मनुष्य किती बरें त्रासदायक आहे, तो आपणाला किती कठोर शब्द बोलला, त्यानें आपणाला किती बरें दुःख दिलें?—या गोष्टींची पुनः पुनः आपल्याशींच चिकित्सा करीत बसणें, यापासून आगीला वारा मिळाल्यासारखें होतें, दुसरें कांहीं हित होत नाहीं. आग अधिकाधिक पेटावयाची आपण एकीकडून तजवीज चालविली, आणि ती विझण्याची वाट पाहत बसलों, तर कसें होईल? आणखी एक मी तुला हजारांतली गोष्ट सांगून ठेवतें. जेव्हां कोणी वाईट शब्द बोलतो, तेव्हां खरोखर पाहिलें असतां त्यांतलें अर्धें भाषणही त्याच्या मनापासून निघालेलें नसतें; आणि कदाचित् रागाच्या तडाख्यामध्यें तो कांहीं भलतेंच बोलला असला, तरी त्याला त्याविषयीं मागाहून लागलाच पश्चात्ताप झाल्यावांचून राहत नाहीं.

**नर्मदा**—कांहीं नाहीं. आमच्या घरच्यांच्या तोंडून जे शब्द बाहेर पडतात, त्यांतून एकूण एक शब्द त्यांच्या मनापासून निघालेला असतो. त्यांनीं मला आळशी ह्मटलें, घरणीला भार ह्मटलें, उधळी ह्मटलें, तूं कूच कामाची नाहींस ह्मटलें, हें सगळें त्यानीं मनापासूनच ह्मटलें आहे. [असें बोलत असतां ती पहिल्याप्रमाणें पुनः रागानें लाल झाली.]

पण तिची मैत्रीण सरस्वती ही तिची रागीट मुद्रा आणि

रागीट भाषण लक्षांत न आणतां ह्मणाली,--पण असें पहा, तूं आपल्या संसाराची नीट काळजी करतेस, कामकाज जेव्हांचें तेव्हां करतेस, आळस करीत नाहींस, असें जर त्याच्या दृष्टीस पडलें, आणि असें दृष्टीस पडलें असतांही जर तुला शिव्या दिल्या, तर त्याचें तें बोलणें कांहीं त्याच्या मनापासून निघालेलें नाहीं, असें तुला दिसेल; एवढें तरी खरें आहे कीं नाहीं? त्यानें जें रागाचें भाषण केलें, त्यामध्यें एकसुद्धां शब्द खरा नाहीं अशी जर तुझी खात्री असली, तर त्या बोलण्याचा तुला राग येणार नाहीं. थोडेंसें मनाला वाईट मात्र वाटेल कीं, यानें असें कृत्य केलें हें कांहीं बरोबर केलें नाहीं, इतकेंच.

**नर्मदा** अतिशयित संतप्त झाली. आपलें बोलणें असें आपल्यावरच उलट फिरेल, हें तिला वाटलें नव्हतें. ती रागानें चवताळून ह्मणाली, "तो बरा, पण तूं मोठी वाईट आहेस. आणखी तुला काय सांगू? तोही असला आहे कीं, जेव्हां तेव्हां मला आपला तुझा दाखला देतो. तूंच त्याची बायको झाली असतीस तर बरें झालें असतें. ह्मणजे तुला समजलें असतें कीं, असल्या राग स्वाधीन नसलेल्या माणसापाशीं राहण्याचें कसें काय सुख आहे तें."

सरस्वती थंडपणानें म्हणाली,–"तें मोठें कठीण काम आहे, हें मी जाणतें, पण शांत भाषणानें राग निघून जात असतो. त्रासांतून सुटण्याची ही फार सोपी युक्ति आहे. तिला कांहीं खर्च तर पडत नाहीं. तेव्हां ती करून तर पहावी."

तिच्या नम्र भाषणानें नर्मदाही थोडी थंड होऊन

म्हणाली, "हें तुझें म्हणणें अगदीं खोटें आहे. त्या युक्तीला खर्च पुष्कळ पडतो. इतका खर्च करायाला पुढें सरणारीं माणसें विरळा, हें मी तुला सांगून ठेवतें."

सरस्वती अमळ हसून म्हणाली,—"तें खरें बाई. पण असें पहा; तूं मला सांग, कीं आपलें मन अमळ घट्ट करायला जे थोडेसे श्रम पडतील त्यांची किंमत अधिक, कीं मग ह्या युक्तीपासून जें मनाला समाधान वाटेल त्याची किंमत अधिक?"

हें समजुतीचें भाषण ऐकून नर्मदेचें मन अतिशयित शांत झालें. आणि ती ह्मणाली, —मी बाई ती युक्ति करून फारशी पाहिलेली आहे असें नाहीं. तरी मला वाटतें कीं, मग जें समाधान होईल त्याची किंमत अधिक यांत संशय नाहीं. तरी या युक्तीचा मी फारसा अनुभव घेतलेला नाहीं. तूं आणखी म्हणशील बाई, 'अनुभव घेतला नाहीं हें फारच वाईट.'

**सरस्वती**—चांगल्या कामाला सदा सुमुहूर्त; 'दुष्काळांत अपरात्रीं जेवण,' म्हणून कोणी सोडूं नये. अगदींच नाहीं त्यापेक्षां उशीरानें तरी केलेलें बरें.

**नर्मदा**—बरें सरस्वतीबाई, तूं आतां खरेंच सांग कीं, माझ्या मनांत असेल तितकें मी केलें, आणि मनांत असेल तितकें मी बोललें, पाहिजे तें केलें, तरी आमच्या एथच्यांचा स्वभाव माझ्या हातून बदलेल असें तुला वाटतें काय?

**सरस्वती**—मला नाहीं वाटत.

ती पुढें बोलते आहे तों **नर्मदा** मध्येंच मोठ्या वि-

जयी मनुष्यासारखी डौलानें ह्मणाली, "हं! आतां कशी कबूल झालीस? आतां जाऊन मी त्यांना सांगतें कीं, जिची तुह्मी इतकी वाखाणणी चालवितां तीच काय ह्मणते तें पहा."

**सरस्वती**—शांतपणें ह्मणाली, "थांब, तूं माझें बोलणें पुरतें ऐकलें नाहींस. मला वाटतें, तुझ्या मनाप्रमाणें होण्याची खटपट तुझ्या हातून बरीच होण्याजोगी आहे. परंतु सर्व गोष्ट पूर्ण होणें हें त्या एका परमेश्वराच्या स्वाधीन. त्याची आह्मी विनवणी केली पाहिजे. ह्मणजे सर्व होईल. कित्येक जणी आपणच सर्व गोष्टी करूं ह्मणतात, आणि इकडून तिकडून खटपट करून शेवटीं कांहीं फळ झालें नाहीं ह्मणजे अगदींच त्या गोष्टीचें नांव टाकतात. गाडीच्या मागें बैल जोडून काय फळ? अशानें घाटावर गाडी चढेल काय? पण बैल जागच्याजागीं जोडले ह्मणजे सहज काम होऊन जातें; अंमळ वेळ पुष्कळ लागेल, ह्मणून काय झालें? आणखी, आमचें काम आह्मी नीट रीतीनें करूं ह्मटलें, तर करायाचें पुष्कळ काम पडलें आहे."

**नर्मदा**—पण इतकें तरी तूं ह्मणशील कीं नाहीं, कीं नवरा वाईट स्वभावाचा असला तर बायकोला तें मोठेंच दुःख आहे?

**सरस्वती**—हें मी ह्मणेन खचीत. पण इतकेंच पहा, कीं घरच्या कांहीं गोष्टींची चौकशी करायाचें काम पुरुषाकडे आहे, तरी **होय** आणि **नाहीं** हे दोन शब्द बायकोच्या हातीं आहेत. आणि जर बायको ह्मणेल, कीं नवरा चांगला

काय, आणि वाईट काय? आणि असें ह्मणून मागेंपुढें न पाहतां हवें तसें बोलूं लागेल, तर मग बरोबरच आहे, जशाचा परिणाम तसा सोसायाला तिणें तयार रहावें, आणि दुःख झालें तर गुपचूप बसावें. मी मघाशीं सांगितलेंच आहे, आणि मला तर खचित वाटतें, बायको भली तर नवरा भला. घटकाभर समज कीं, पुरुष बाहेरून घरीं आला. आणि त्या वेळीं, तें लहानसें जरी घर असलें, तरी जिकडे तिकडे झाडून पुसून स्वच्छ, वस्त्रें पात्रें जिकडचीं तिकडे नीट मांडून बेतावातानें ठेवलेलीं, बायको मोठ्या आनंदित मुद्रेनें बसलेली, उनउनीत खमंग स्वयंपाक करून ठेवलेला, आणि ती त्याची मोठ्या हौसेनें वाट पाहत बसली आहे, असें जर त्याच्या दृष्टीस पडलें, तर तूं कशाला बोलतेस, तो कितीही दुर्मुख्या असला, तरी त्या घराच्या निर्मळपणामध्यें, आणि त्या ठाकठीकपणामध्यें, आणि तिच्या त्या आनंदी स्वभावामध्यें आणि हरएक गोष्टीमध्यें जें कांहीं मंत्रसामर्थ्य आहे, तें त्याच्या स्वभावाला शांतता आणीलच. असें चांगलें मधुर भोजन, आणि अशी चांगली सुमुखी स्त्री पाहून जर त्याचें मन द्रवत नाहीं, तर मात्र तो वाईट स्वभावाचा पुरुष खरा. पण हिच्या चुलीवरच्या तपेल्यामध्यें तांदूळ पडण्याकरितां सगळ्या दिवसाचे श्रम काढून, पावसामध्यें उन्हांमध्यें फिरून, जेव्हां तो घरीं येतो, तेव्हां जर त्यानें पाहिलें, कीं धड चुलींत विस्तू नाहीं, घरामध्यें केराच्या राशी, पोरें तर ओरडताहेत, आणि बायको तर,—आपण बाहेरून घरीं येण्याच्या

पूर्वीं जेथच्या तेथें सर्व वस्तु ठाकठीक ठेवण्यामध्यें जो वेळ घालवायाचा, तो शेजारणीच्या घरीं गप्पा-ष्टकांमध्यें घालवून, नुकतीच घाईघाईनें घरांत शिरत आहे,—असें जर त्याणें पाहिलें, तर तो वाईट स्व-भावाचा मनुष्य अशा रीतीनें चांगल्या स्वभावाचा हो-ईल, असें कोण बरें ह्मणेल? तो गोंगाट करून सगळें घर दणाणवील; आणि इतकेंच करून राहिला तर नशीब बरें; नाहीं तर एकादे वेळीं संतापानें बाहेर जाऊन कोठें तरी हलकट लोकांच्या संगतींत शिरून, आठचार दिवसांपुरते आणलेले पैसे, इकडे तिकडे खर्चून कोठें तरी भटकत राहिला, तर काय करायाचें आहे?

**नर्मदा**—तुझ्या बोलण्यामध्यें कांहीं थोडेंसें खरे-पण आहे; नाहीं असें मी ह्मणत नाहीं. पण तुझ्या बोलण्याचा भाव असा दिसतो, कीं बायकांनीं दिवसभर नवऱ्याची तव्यत संभाळण्याखालीं मरत असावें, त्यांना दुसरें कामच नाहीं. बायकांनीं मात्र आपली ही कपाळ-कूट काढावी; आणि पुरुषांना कांहीं निर्बंध असावा असें तुला नाहीं का वाटत?

**सर०**—नाहीं कसें? पण इतकेंच, कीं आतां आह्मी फक्त आमच्या कामाच्या गोष्टी बोलत आहों, त्यांच्याविषयीं-च्या नाहीं. आतां तूं ह्मणतेस तें खोटें नाहीं, कीं असे कांहीं वाईट कित्येक पुरुष आहेत, कीं फक्त ईश्वरानेंच ते ताळ्यावर आणले तर आणावे, माणसाच्यानें तर त्यांच्या हातून कांहीं चांगली गोष्ट करववेल असें व्हा-याचें नाहीं. परंतु असले पुरुष पुष्कळ असतील असें

मला वाटत नाहीं. चांगली बायको जर आहे, तर तिजवर प्रीति करावी असा पुरुषाचा जन्मस्वभावच आहे. आणखी, जरी त्याचा स्वभाव वाईट असला, तरी त्याला चांगलें जेवण तरी आवडतेंना? स्वस्थ असावें आणि कपाळाशीं टिकटिक नसावी इतकें तरी वाटतेंना? तशा मनुष्याला तेवढेंच पहिल्यानें द्यावें, ह्मणजे प्रीति आपोआप मागाहून येते.

**नर्मदा**—पण असें कशासाठीं? पुरुषाला मात्र टिकटिक नको, आणि बायकोचा जीव नव्हे वाटतें? तिनें मात्र सगळा त्रास सोसावा?

**सर०**—असे शब्द कांहीं माझ्या तोंडून निघाले नाहींत. आणि कदाचित् निघाले असले तरी माझा भावार्थ तसा नाहीं. या पृथ्वीवर जिकडे तिकडे त्रासच भरले आहेत, आणि आह्मी कांहीं जरी केलें तरी ते सुटत नाहींत. आह्मां बायकांचे त्रास अंमळ वेगळ्या तऱ्हेचे आहेत, पुरुषांचे वेगळ्या तऱ्हेचे आहेत, परंतु त्रासांतून ह्मणून कोणी सुटलेलें नाहीं. तूंच पहा आतां, सकाळपासून संध्याकाळपर्यंत पोटासाठीं उन्हांतून तर उन्हांतून, पावसांतून तर पावसांतून, ओझें घेऊन तर ओझें घेऊन, एकसारखे श्रम करावे, हे काय थोडके त्रास आहेत? तसेंच, भाड्याची गाडी घेऊन गिऱ्हाइकाची वाट पाहत प्रहरांचे प्रहर हातपाय आखडून तिष्ठत बसावें आणि घोड्याबरोबर, थंडीवाऱ्यांतून—पावसांतून आपले हाल करून घ्यावे, हे काय थोडे त्रास आहेत? तसेंच, चाकरीवर कचेरींत जायाचें, तेथें तरी, जायाला एक

पळभर उशीर झाला, किंवा सकाळपासून संध्याकाळपर्यंत खरडे घाशीत असतां—मनुष्य आहे—कोठें एकादी चूक झाली, तर झाला दंड; हे काय थोडे त्रास आहेत?

**नर्मदा**—आतां पुरे कर. तूं आपली बरीच मीठ-मिर्ची लावीत चाललीस. उगीच आपले पुरुषाला सगळे त्रास त्रास ह्मणून कांहीं उपयोग नाहीं.

**सर०**—मी आपली उगीच कांहीं तरी बडबड करतें ह्मणून तूं नको समजूं. पण मला ठाऊक आहे कीं, आपला घरसंसार नीट व्हावा ह्मणून हे सगळे त्रास. आणखी यांशिवाय दुसरेही त्रास पडले तरी ते सोसायाला पुरुष तयार असतो. त्याचे त्रास असे आहेत, आणि ते सहन करण्याचें काम ह्मटलें ह्मणजे बहुत करून त्याच्या बायकोच्या गुणांवर आहे; तिनें त्याला ते त्रास सोसायाला शिकविलें पाहिजे. ह्मणजे याचा अर्थ काय असें तूं ह्मणशील, तर तुला सांगतें. स्वतः तिनेंही आपले त्रास मोठ्या धैर्यानें सोसले पाहिजेत, हा त्याचा अर्थ. आतां याच्या पुढें मी एक गोष्ट कबूल करतें कीं, पुरुषाच्या त्रासापेक्षां बायकोचे त्रास अधिक आहेत यांत संशय नाहीं.

**नर्मदा**—बरें तर ही गोष्ट आमच्या घरीं जाऊन मी सांगतें.

**सर०**—सांग हवी तर, पण लक्षांत ठेव, तुझें बोलणें ऐकून तो हंसेल मात्र, आणि ह्मणेल कीं, यांत कांहीं जीव नाहीं. तेव्हां मात्र तूं त्याच्या उलट बोलूं नको. मी तुला सांगतें, बायकोला इकडच्या तिकडच्या लहान

मोठ्या किती कटकटी काढाव्या लागतात आणि त्रास सोसावे लागतात, ते पुरुषाला समजत नाहींत; आणि कितीही खटपट करून त्या तूं त्याच्या मनांत भरवायाला पाहशील, तरी त्या त्याच्या मनांत भरणार नाहींत. मन घट्ट करून त्याचें बोलणें ऐकून घे, आणि त्यावर कांहीं बोलूं नको. तें तुला कठीण वाटेल, तरी सोसलेंच पाहिजे.

**नर्मदा**–हो, असे शब्द सांगायाला कांहीं वाईट नाहींत, पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं.

सरस्वतीनें क्षणभर आपल्या हातचें काम ठेवलें, आणि उदासपणानें ह्मणाली,–"सांगतें ऐक, आज त्या गोष्टीला पुष्कळ वर्षें झालीं. आमच्या घरची बाई गोष्ट अशीच एकदा झाली. आतां आमच्या मनांत विकल्प नाहीं, पण त्या वेळीं अंमळ आमच्या आमच्यामध्यें कटकट होऊं लागली. मला वाटूं लागलें, ते मजवर वक्रदृष्टि करतात; आणि मग मी तर खचितच त्यांच्याशीं फारच उद्धटपणानें वागूं लागलें. आणि एक दिवशीं मी एकटीच बसून आपली रड रड रडूं लागलें. मला सगळें घर अगदीं उदास दिसूं लागलें. इतक्यांत बाई खाडकन दरवाजा कोणी लोटला म्हणून पाहतें, तों आंत आमची साळूबाई येऊन बसली. ती पुष्कळ वर्षांची माझी मैत्रीण होती, आणि तिचा स्वभाव मोठा ममताळू होता, आणि खरोखरीं ती फारच चांगली बायको होती. मी दुःखी होऊन बसलेली पाहून तिनें इतक्या शांतपणानें भाषण चालविलें, कीं माझी सगळी गोष्ट मी तिच्यापुढें वदलें, आणि तिला सांगितलें कीं, हल्लीं हल्लीं त्यांची तब्यत संभाळणें

मोठें कठीण पडतें, अशी माझी अवस्था झाली आहे. तिनें सगळें ऐकून घेतलें, आणि म्हणाली, 'सरस्वती, जंवपर्यंत मनुष्याच्या आंगामध्यें सहनशीलता आली नाहीं, तंवपर्यंत तें मनुष्य कच्चें असतें, त्यामध्यें पोक्तपणा येत नाहीं. आणखी मी तुला सांगून ठेवतें कीं, सहनशीलपणा म्हणून जो आहे, त्यासारखी या पृथ्वींत दुसरी वस्तु नाहीं. एका सहनशीलपणामुळें सर्व दुःखें नाहींतशीं होतात. हें माझ्या अनुभवावरून मी तुला सांगतें. प्रथमतः सहनशीलपणा धरणें हें फार कठीण वाटेल यांत संशय नाहीं; पण एक निश्चय आणि परमेश्वरावर भरिंभार ठेवावा, म्हणजे दिवसेंदिवस तें सोपें वाटत जाईल; आणि जेव्हां तुझे केस माझ्या सारखे पांढरे होतील, आणि हातापायांमध्यें सामर्थ्य नाहींसें होईल, तेव्हां तर सहनशीलपणाचें तुला अगदीं ओझें वाटणार नाहीं; त्यापासून तुला समाधानच उत्पन्न होईल, आणि भगवंताच्याठायीं चित्त लीन होऊन जाईल, साळूबाईचे हे शब्द ऐकून आज पुष्कळ वर्षें होऊन गेलीं. पण मला त्यांची कधींहीं विस्मृति पडणार नाहीं. ती तर निघून गेली, पण माझ्या हातून तिचे उपकार फिटायाचे नाहींत.

असें बोलत असतां सरस्वतीचा कंठ सद्गदित झाला; कांहीं वेळपर्यंत दोघीही स्तब्ध राहिल्या. इतक्यांत एकाएकीं घड्याळाचे ठोके वाजले, त्यामुळें नर्मदेच्या लक्षांत आलें कीं, मी शेजारणीच्या घरीं फारच वेळपर्यंत गप्पा छाटीत बसलें; आणि तिच्या भाषणावरून आपल्या मनावर केवढा परिणाम झाला, हें तिच्या लक्षांत

येऊं न देण्याकरितां ह्मणाली, "बरें बाई उशीर झाला. येतें आतां."

सरस्वतीचें भाषण विसरून जाण्याकरितां तिनें पुष्कळ प्रयत्न केला, परंतु व्यर्थ. तिला आवडो किंवा न आवडो, ते शब्द तिच्या कानामध्यें गुणगुणूं लागले. आणि तिच्या मुखांतून 'बायको भली तर नवरा भला,' हे शब्द आपोआप बाहेर पडूं लागले.

नर्मदा आपल्या घरच्या पायऱ्यांवरून चढत असतां मनांत ह्मणते, "काय त्या सरस्वतीचें बोलणें तरी भलत्याचें भलतेंच; विलक्षण कांहींचेबाहींच बोलत असते." असें बोलून ती पुढें गेली, आणि घरामध्यें पडलेला केरकचरा पाहून ह्मणते, "तें खरें, पण तिचें बोलणें जर आपण लक्षांत आणलें, तर बाहेरून थकून आलेल्या मनुष्याला घटकाभर विश्रांति घ्यायाला ही घाणेरडी जागा कांहीं उपयोगाची नाहीं हेंही खरें आहे. माझें बोलणें कोणी ऐकेल आणखी. पण कांहीं जरी झालें तरी माझें मलाच वाटतें कीं, सरस्वतीचें ह्मणणें खरें आहे."

या वेळीं नर्मदेचें घर दुसऱ्या कोणाच्याही दृष्टीस पडलें असतें, तर त्यानेंही तसेंच म्हटलें असतें. चुलीमध्यें सगळी राख चोंदलेली होती. तींतूनच थोडथोडा धूर येत होता. खरकटीं भांडीं, आणि नर्मदेच्या जेवणाचीं उष्टीं तशींच पडलेलीं होती. एकीकडे थोडी भाजी पडली आहे, एकीकडे भिंतीला तेलातुपाचे डाग लागले आहेत, आणि त्या जमिनीला, महिना पंधरा दिवसांत सारवण, किंवा केरसुणीही लागली नसावी असें दिसत

होतें. ती म्हणाली, "खरेंच बाई हें बरें दिसत नाहीं. ते घरीं येण्याच्यापूर्वीं हें सगळें ठाकठीक होतें कीं नाहीं, कोण जाणें!" असें म्हणून ती आपलें लुगडें नीट सांवरून कामाला लागली. आणि त्या दिवशीं तिनें तें काम जसें उमेदीनें मनावर घेतलें, तसें पुष्कळ दिवस घेतलें नव्हतें,—तिचें लग्न झाल्यापासून सुद्धां म्हटलें तरी चिंता नाहीं. काम तर पुष्कळ होतें, नवरा आपल्या कामावरून घरीं परत येई तों पर्यंतही संपायचें नाहीं इतकें होतें. तरी पहिल्यानें तिनें सगळा केर काढून टाकला. हातपाय धुवून स्वच्छ झाली. चुलीकडे जाऊन सगळी राख भरून टाकली. स्वच्छपणें चांगला स्वैंपाक केला. नवऱ्याचा पाट मांडून ठेवला, तांब्या पंचपात्री पळी ताम्हन मांडलें, ताट वाट्या ठेवल्या. आणि नंतर अवकाश आहे असें पाहून पुनः बाहेर येऊन नवऱ्याला बसायाला मांडिलें, एक दोन खुर्च्या होत्या त्याही साफसूफ करून ठेवल्या. नंतर आपले केस अस्ताव्यस्त झाले आहेत असें पाहून, ते नीट चांगले विंचरले—तेही पुष्कळ असून चांगले सुंदर व लांब होते. चांगली वेणी फणी केली. तोंड स्वच्छ धुवून चांगलें कुंकू लावलें. आणि ठाकठीक होऊन, अंधार पडतांच स्वच्छ समई लाविली, आणि मग नवऱ्याचे अंगरखे, आणि धोत्रें बित्रें घेऊन, कोठें फाटलें तुटलें होतें तें नीट करीत बसली. व त्याची घरीं जेवायाला येण्याची वाट पाहूं लागली. पण पुनः मनांत ह्मणूं लागली, "ते आतां येतील काय घरीं? सकाळीं भांडून बाहेर गेले, ते कोठें तरी जाऊन त्रासानें निजून राहिले

नसतील, किंवा भटकत फिरत नसतील ना?" नर्मदेनें पुनः पुनः घड्याळाकडे पहावें. पण जसजशी रात्र वाढत चालली, तसतसा नवऱ्याचा राग तिच्या मनामध्यें पुनः चढत चालला. ती ह्मणाली, "पहा आतां, याच्यासाठी मी इतके श्रम करून सगळी तयारी करून ठेवावी, आणि यानें आलेले पगाराचे पैसे घेऊन हिंडायाला जावें, आणि मला एथें खोंकत बसवावें!" असे विचार तिच्या मनांत आले, परंतु त्याच्या रागाला मूळ कारण आपणच्च हें ती विसरून गेली. असें चाललें असतां एकाएकीं, कोणी मनुष्य त्या अंधारांत बोलल्याप्रमाणें, "बायको भली तर नवरा भला," हे शब्द पुनः तिच्या स्मरणांत आले. त्या वेळीं तिनें त्या शब्दांकडे नीट लक्ष लाविलें म्हणून फार चांगलें झालें; कारण एका क्षणामध्यें तिच्या नवऱ्याचे पाय पायऱ्यांवर वाजलेले तिच्या कानीं पडले. आणि पुनः एक क्षण गेला नाहीं तोंच, तो त्रासानें व्यापलेला, व कपाळास आठ्या घातलेला, आणि उदास झालेला, असा आंत शिरला. पण बायको ठाकठीक झाली आहे, घर चांगलें स्वच्छ निर्मळ झालें आहे, आणि जेवणाची सर्व तयारी आहे, असें पाहून नारोपंताच्या कपाळाच्या आठ्या सुटत चालल्या. तो आश्चर्यानें म्हणाला, "आजचा डौल कांहीं बोवा निराळाच दिसतो; आज इतकी खटपट कशाची बरें ही?"

हें ऐकून, आपणास राग आला किंवा आपलें मन विरस झालें, असें न दाखवितां नर्मदा अमळ हसून ह्मणाली, " मला नाहीं बाई ठाऊक खटपट कशाची ती. सकाळीं

एकदा खटपट झाली, तेवढी मला वाटतें आजच्या दिवसाला पुष्कळ झाली. जीव थकला असेल असें वाटलें, ह्मणून स्वयंपाक करून तयार ठेविला आहे."

"तुला वाटलें तें खोटें नाहीं. आज मला अंमळ जास्ती काम होतें, त्यामुळें अशी कडकडून भूक लागली आहे कीं तुला काय सांगूं!"

नारोपंताचें जेवणखाण होई तोंपर्यंत नर्मदेनें शाहाण्या बायकोचें काम केलें; ती मध्यें कांहींच बोलली नाहीं. नंतर तो तृप्त होऊन पानसुपारी खात खुर्चीवर बसला असतां हळूच ती जवळ जाऊन ह्मणाली, "बरें, मी आजपासून जर संसार नीट चालविला, आणि कांहीं कटकट केली नाहीं, तर, मग तरी बाहेर इकडे तिकडे जायाचें बंद होईलना?"

नारोपंत खाऊन पिऊन संतुष्ट झाला होता, तो ह्मणाला, "हो, ठीक आहे; अग, मी सांगतों, जर मला घरामध्यें कटकटीवांचून शांतपणें चार घटका बसायाला मिळालें, तर कांहीं मी बाहेर भटकायाला जायाचा नाहीं. आणि आजच्या जेवणासारखें जर मला दररोज जेवण मिळालें, तर तुला अधिक काय सांगूं, माझ्या तोंडांतून एकही वांकडा शब्द निघणार नाहीं, हें माझें वचन घे."

इतक्यांत पुनः, "बायको भली तर नवरा भला," या शब्दांचा ध्वनि कानीं पडल्याचा तिला भास झाला. पण या वेळीं तिला त्यापासुन मोठा आनंद वाटला; आणि आपला

नवरा जवळ आहे याचें तिला भान न राहून ती मोठ्यानें ह्मणाली, " खरें. मलाही तें खरें वाटतें."

नारोपंताला वाटलें कीं, बायको आपणाला बोलली; दुसऱ्या कोणी अदृश्य कल्पनेला बोलली असें त्याला वाटलें नाहीं. ठीकच. त्यानेंही तें भाषण चांगल्या अर्थानें घेतलें, आणि आपला हात बायकोच्या कमरेसभोंवतालून घेऊन, तिचा मोठ्या प्रेमानें त्यानें मुका घेतला. नंतर तो ह्मणाला, "गडे, जें आपण एकदा बोललों तें आतां कायम. तुझें वचन तूं राख आणि माझें मी राखीन, यांत अगदीं संशय धरूं नको."

असे करार झाल्यानंतर, ते दोघांनीं कसकसे चालविले याविषयीं फार बारीक चौकशी करणें बरोबर नाहीं. वाईट खोडी लागलेल्या एका दिवसांत सुटत नाहींत, यामुळें त्या दोघांमध्यें अगदीं चांगला समेट होई तोंपर्यंत पुष्कळदां दोघांच्या कटकटी झाल्या. पण नारोपंताचें बाहेर भटकणें दिवसेंदिवस कमी पडूं लागलें, तसतसा त्याचा रागीट स्वभावही ताळ्यावर येत चालला. आणि घरामध्यें त्याला विश्रांति मिळूं लागली, तसतसें त्याच्या हातून कामही चांगल्या रीतीनें होऊं लागलें, आणि तो पगार अधिक मिळवूं लागला. इतकेंच नव्हे, तर घरच्या बंदोबस्ताकरितां तो सगळा पगार घरीं आणूं लागला.

एक दोन वर्षें गेलीं. एके दिवशीं नर्मदेची मावशी सावित्रीबाई पुण्याहून तिला भेटण्याकरितां आली. तिला या दोघांचाही भांडखोर स्वभाव माहित होता. परंतु

इकडे आल्यावर तिनें जो त्यांच्या स्वभावामध्यें फेर पडलेला पाहिला, तेणेंकरून तिला मोठें आश्चर्य वाटलें. तिला ती ह्मणाली, "कां ग नर्मदे, तुझा नवरा हल्लीं बराच निवळला आहे. आतां त्याचा स्वभाव शांत दिसतो, आणि संसाराचीही त्याला काळजी लागलेली दिसते. त्यानें घरदार बरें केलें आहे. एकून 'बायको भली तर नवरा भला' ही गोष्ट खरी आहे."

काय! पुनः तेच शब्द! जे तिनें यापूर्वीं शेंपन्नास वेळां ऐकिले होते तेच! पण ते शब्द या वेळीं तिला भयंकर वाटले नाहींत; तर ते आतां सुस्वर गायनाप्रमाणें तिला वाटूं लागले. आणि नवऱ्याचें ताट वाढण्याकरितां ती चालली असतां, जसे कांहीं गायनाच्या तालावर पाय पडावे, अशी ती आनंदानें चालूं लागली.

अहाहा! तिला आपलें घर ठाकठीक ठेवण्याला अंमळ अधिक श्रम पडले, ह्मणून काय चिंता आहे? आणि कधीं एकादा कठीण शब्द ऐकून घ्यायाचा पडला ह्मणून तरी काय? ती अगदीं डगमगली नाहीं. जसें सूर्याचें थोडेसें किरण असलें तरी, तें ढगांतून भेदून पार व्हावें, तसें तिचें धैर्य रागाच्या ढगाला भेदून पार होऊं लागलें. पुढें तिला मुलें बाळें झालीं, आणि सुखाचे दिवस अधिक अधिक येऊं लागले, तेव्हां नर्मदेनें सरस्वतीबाईचे उपकार मानावे, आणि ह्मणावें कीं, "सरस्वतीबाई, तुह्मी सांगितलें होतें तें कांहीं खोटें नाहीं हो. बाई. आणि संसारामध्यें किती ही अडचणी असल्या, तरी परमेश्वरावर भरंवसा ठेवून आपण स्वतः जर चांगल्या

रीतीनें वागलों, तर त्या सर्व अडचणी दूर होऊन शेवटीं आपलें कल्याणच होईल यांत संशय नाहीं."

---

## सुसंवाद ३.

**सरस्वतीबाई**—कसें काय गोपिकाबाई, काय चाललें आहे?

**गोपिकाबाई**— या सरस्वतीबाई, पुष्कळ दिवसांनीं वाट चुकलां; पण आलां, त्या बऱ्या वेळीं आलां. या वसा. तुह्माला आतांच मी बोलवायला पाठविणार होतें. या आमच्या जगदंबाबाई आज सासरून आल्या आहेत, यांची अंमळ फिर्याद ऐका.

**सर०**—आपल्याला नकोत बाई कोणाच्या फिर्यादी आणि चौकशा. देवानें दिले तर चार घास खावे आणि स्वस्थ बसावें, ह्मणजे झालें.

**गोपि०**—तसें नव्हे. तुह्मी वडील माणसें, ह्मणून तुह्मांला चार गोष्टी विचारायच्या. आणि तुह्मीच जर असें बोलूं लागलां, तर मग कसें बरें व्हावें?

**सर०**—वडीलपण! आतां आमच्या वडीलपणाला पुसतें कोण? बरें पण तुमचें ह्मणणें तरी काय आहे?

**गोपि०**—काय ह्मणजे? ती सासू तर कशी खष्ट मिळाली आहे, ती तुम्हांला ठाऊकच आहे. आणि इकडे तरी काय, या श्रीमंतांच्या पोरी. तेव्हां एकीची उडी

सवा हात, तर दुसरीची साडेतीन हात. तेव्हां आतां पुढें हें व्हावें तरी कसें?

**सरस्व०**—पण झालें तरी काय?

**गोपि०**—काय झालें तें त्यांनाच विचारा.

**सर०**—कांग बाई चंद्रे, अशी पुढें तरी ये. काय, झालें काय? मला सांग तर खरी.

**चंद्री०**—व्हायाचें तें आणखी काय? जेव्हां तेव्हां आपली दुसपुस. कांहीं काम केलें तरी मनालाच यायचें नाहीं. कुठचें असेंच केलें, कुठचें तसेंच केलें, ह्मणून ठोमणे आहेतच.

**सर०**—बरें, तूं सासूच्या घरीं काम तरी काय काय करीत असतेस?

**चंद्री०**—काम कसलें करणार? आह्मी काम करायचें, तर मग चाकरमाणसें आणि शागीर्द कशाला पाहिजेत? त्यांना निरोप देऊन टाकावा, ह्मणजे बायका कामें करतील.

**सर**—असें एकून. तर मग तुम्हांला कांहीं काम करावें लागत नाहीं?

**चंद्री**—त्यासाठींच तर या कटकटी. आम्हांला कांहीं विकत घेतलें आहे का कोणी? आमच्या वाडवडिलांनी राशींच्या राशी ओतल्या आहेत म्हटलें. अंमळ कोठें मोठ्यानें बोलायाची चोरी, हसायची चोरी, हें हो काय? आतां पूर्वींच्या काळचे दिवस गेले, हें कोणी लक्षांत आणीत नाहीं. आणि जेव्हां तेव्हां म्हणायचें कीं, "आतांच्या पोरींना भीड मर्यादा म्हणून कांहींच नाहीं." मनुष्यानें सदासर्वदा

तोंड शिवूनच बसावें वाटतें? मनुष्य आहे, कोठें करमत नाहीं म्हणून एकादें पुस्तक वाचीत खुर्चीवर बसलें, तर यांची स्वारी पुढें आल्याबरोबर, तें वाचणें एकीकडे गुंडाळून ठेवून, आधीं उभें राहिलें पाहिजे!

**सर०**—बरें चंद्रे, आतां जुने दिवस गेले, म्हणून जें तूं म्हणालीस त्याचा काय बरें अर्थ? नव्या पोरींनीं जुन्या माणसांना मान देऊं नये म्हणून तुला कोणीग शिकविलें?

**चंद्री**—मान देऊं नये असें नाहीं. पण सगळीच त्यांची जुनी तऱ्हा. आतांच्यासारखें त्यांना लिहितां वाचतां का येतें? शुद्ध बोलतां सुद्धां येत नाहीं. व्याकरण म्हणजे काय हें सुद्धां ठाऊक नाहीं. आणि यांना मोठेपणा पाहिजे! कशाला तो?

**सर०**—कां चंद्रे, तुम्ही लिहायाला वाचायाला शिकलां, त्यांचीं हींच काय फळें? शाबास! वडील माणसांना लिहितां वाचतां येत नसलें तर त्यांना मान देऊं नये, असें लिहिलें आहे काय तुमच्या पुस्तकांमध्यें? त्यांना लिहितां येत नाहीं म्हणून त्यांची आज्ञा मानूं नये तर एकून?

**चंद्री**—मानूं नये असें नाहीं. पण उगीच उठून उभें रहावें, सासूबाईसमोर खुर्चीवर बसूं नये, जमिनीवर आडवें पडूं नये, हा कसला मान? चोरासारखें हळूच बोलावें, कांहीं मौज दृष्टीस पडली तरी हसूं नये, ही कसली रीत?

**सर**—चंद्रे, या रीति आणि हे मान जुन्या काळचे खरे, पण ते वेडेपणाचे नव्हेत बरें काय? वडील माणसांसमोर

आळ्यतेनें बसणें, किंवा लोळणें, आणि तीं खालीं बसलीं असतां आपण खुर्चीवर बसणें, ही त्यांची अप्रतिष्ठा आहे; आणि असल्या कृत्यांपासून आपणालाही मोठेपणा येतो असें नाहीं. उलट हलकटपणा आणि मूर्खपणा आंगीं लागतो. तसेंच मोठा घसा काढून बोलणें, खो खो खो हांसणें, यांतही बायकोच्या जातीला भूषण नाहीं. बायकोचा शब्द कसा नाजूक असावा; हसणें दुसऱ्याला ऐकूं जाऊं नये, चालतांना पाय वाजूं नयेत, या गोष्टींपासून तिला मोठेपणा आहे, आणि आईबापांलाही भूषण आहे. नाहींतर आपल्यालाही दूषण, आणि अमक्या तमक्यांच्या पोरींना रीत नाहीं, आईबापांची शिक्षा नाहीं, असें लोक बोलूं लागतात.

चंद्री—पण जन्माचाच घसा मोठा, तो लहान कसा होईल ?

सर०—गोपिकाबाई, मी म्हणतें म्हणून राग करूं नका. जशी शिक्षा असेल तसें सर्व होतें. पहिल्यापासूनच कोमळ शब्दांनीं बोलण्याची शिक्षा असली, ह्मणजे कांहीं कठीण वाटत नाहीं. आणि अजून तरी जपून नेम चालविला, तर ही गोष्ट स्वाधीनची आहे. अगत्य मात्र असलें पाहिजे.

चंद्री—बरें हो सरस्वतीबाई, तुह्मी जेव्हां तेव्हां माझें बोलणें खोटें करूं पाहतां. तुम्हीही जुन्या माणसांतल्याच कीं नाहीं?

सर०—होय, पण तुमच्या कोणच्या पुस्तकामध्यें मी

सांगतें हें खोटें म्हणून लिहिलें आहे, वाच पाहूं? आमच्या नानाला मी विचारतें.

**चंद्री**—तसें कोठें लिहिलें नाहीं. पण हें हो काय? एवढी श्रीमंती आहे, म्हणून, कोठें घटकाभर स्वस्थ बसलें, तर कोठचीं भांडीं विसळून दे, कोठचा स्वयंपाक कर, कोठची चोळीच शिव, कोठची रांगोळीच घाल, कांहींना कांहीं कटकट मागें आहेच. इतकें सांगून आणखी वर म्हणायचें, कीं "आतांपासून काम करण्याची सवय असली, तर पुढें संसार कराल. नाहीं तर पुढें काय होणार आहे?"—पण घरांत चाकर माणसें काय कमी पडलीं आहेत? असें असतां, आपण काम करायचें, तर श्रीमंत हें नांव कशाला लावून घ्यावें?

**सर०**—कां गोपिकाबाई, ऐकलेंत ना चंद्राबाई काय म्हणताहेत तें? घरांत श्रीमंती असली, म्हणजे यथास्थित खावें, आणि स्वस्थ लोळत पडावें, हाच काय तो उद्योग? होयना चंद्राबाई? आळशासारखें लोळत पडून वेळ तरी कसा जात असेल बाई तुमचा, ईश्वराला ठाऊक.

**चंद्री**—आमची सासूबाईही जेव्हां तेव्हां असेंच म्हणते. हेच अगदीं शब्द. पण असें जर म्हणावें, तर मग गरीबांमध्यें आणि श्रीमंतांमध्यें भेद तो कशाचा हो बाई? दिवसभर काम कर कर करून हाडें नरम करून घ्यावीं, तर श्रीमंतीचें सुख तें केव्हां भोगावें?

**सर०**—चंद्राबाई, घरीं श्रीमंती असली म्हणून कांहीं कामधाम करूं नये असें नाहीं बरें का? घरीं चालण्याजोगें असतां, मोठमोठे कावाडकष्ट करून शरीराला मुद्दाम

त्रास करून घ्यावा हें फार वाईट; पण आळसापासून कांहींच सुख होत नाहीं. जशी कावाडकष्ठापासून शरीराला पीडा होते, तशीच आळसापासूनही होते. अन्नपचन होत नाहीं, हळूहळू अनेक रोग जडतात. याकरितां श्रीमंतांच्या बायकांनींही कांहीं ना कांहीं अंगमेहनतीचें काम केलेंच पाहिजे. घरांत चालण्याजोगें असतांही तिनें घरचीं कित्येक कामें केलीं पाहिजेत; त्यांत नेहमीचा स्वयंपाक करणें हें जरी तिच्या आंगावर पडत नाहीं, तरी तो तिला करतां आला पाहिजे. पक्वान्नें करण्याचें काम तर श्रीमंतांच्याही स्त्रियांनीं आपल्या हातून जाऊं देऊं नये. पक्वान्नें करतां येणें, हें तरी मोठें भूषण आहे. स्वयंपाकाचा बेतबात बरोबर ठेवणें, पंक्ती बरोबर मांडविणें, हें बायकांनीं खुद्द आपलेंच काम असें समजलें पाहिजे. याशिवाय पंक्तींतून वाढणें या गोष्टीची तर मुद्दाम सर्व बायकांनीं सवय ठेविली पाहिजे. सवय नसल्यास, हातपाय थरथरूं लागतात, आणि भलता जिन्नस भलतीकडेसच पडतो. एकादे वेळीं हातांतून भांडें सुटून पडतें, किंवा दोन्ही हात अडले असतां, आंगावरील लुगडें किंवा पदर अस्ताव्यस्त होऊन गोंधळ होतो. याकरितां पात्रें वाढण्याची सवय तर ठेविलीच पाहिजे. कांहीं गोंधळ न होतां स्वस्थ चित्तानें आणि ठाकठीकपणें जिला पात्रें वाढतां येत नाहींत, ती श्रीमंताची बायको असली तरी तिची थट्टा झाल्यावांचून राहत नाहीं. कितीक बायका मी अशा पाहिल्या आहेत, कीं त्यांना आपल्या थोड्याशा श्रीमंतीच्या तोऱ्यामुळें,

केरकचऱ्यामध्यें बसणें सुद्धां वाईट वाटत नाहीं. झाडें-लोट करणारीण जर एकादे वेळीं कोठें अडली असली, आणि थोड्याशा श्रमानें तो केरकचरा दूर होण्याजोगा असला, तरी त्या तिकडे कधीं ढुंकूनही पाहणार नाहींत. कुळंबिणीला हजारो शिव्या देतील, पण आपल्या हाता-पायांना कांहीं थोडासा श्रम न देतां, तश्शा त्या घाणेरड्या जागीं त्या बसून राहतील. हें फारच वाईट.

**चंद्री**—तुझी तर घरांतला केर सुद्धां काढायला सांगणार एकून!

**सर०**—श्रीमंतांच्या बायकांनीं केर काढावाच असें मी ह्मणत नाहीं. पण अडचणीच्या वेळीं कचऱ्यामध्यें ब-सण्यापेक्षां केर काढावा हें बरें.

**चंद्री**—आह्मांला इतकी गरज नाहीं पडली. तुमचे-कडे फिर्याद सांगायाला जावें, तर तुम्ही उलट आम्हा-लाच शिकवितां.

**सर०**—मला बरें वाटलें तें बाई मी बोललें. ऐकायाचें असेल तर ऐका, त्यांत तुमच्याच बऱ्याची गोष्ट आहे. नाहींतर मर्जी तुमची.

**गोपि०**—चंद्रे, आतां तोंड पुरे कर, सरस्वतीबाई सांगताहेत तें निमुटपणें ऐक, उगीच चावटगिरी करूं नको.

**सर०**—चंद्रे, बायकांना, देवाची भक्ति, आणि नव-ऱ्याची प्रीति असली पाहिजे हें तर खरेंच, पण संसार नीट चालविण्याला, घरच्या सगळ्या कामाची माहितीही तिला असली पाहिजे; आणि आळशी न बसतां आपल्या

कुटुंबांतील मनुष्यांचें आणि गरीबगुरीबांचें कल्याण कर-
ण्याकडे तिणें सर्वदा लक्ष ठेवावें हें योग्य आहे.

**चद्री**—पुढें काय बोलावें हें नाहीं बाई मला सुचत. तेव्हां तुमच्या ह्मणण्याप्रमाणें तरी करून पाहूं.

